# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २२/०१/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २२/०१/२००४ रोजी सभा सुचना क्र. ३० दि. १७/०१/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ११) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १५) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. २०९ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सदरचे इतिवृत्तांत मंजुरीचा ठराव मी मांडत आहे.

**शरद पाटील :-**

नाही. ठराव मांडत आहे म्हणजे काय? पद्धतीनेच जाऊ द्या.

**चंद्रकांत वैती :-**

सभापतीसाहेब पेज नंबरप्रमाणे जाउ दे.

**शरद पाटील :-**

ठराव मांडला पण पध्दत संपली का?

**हॅरल बोर्जीस :-**

पान क्र. ३३ वर मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये आपल्या मैदानाचा जो विषय होता त्या संदर्भामध्ये शहर अभियंत्यांना, उपआयुक्तांना आपण तशी विनंती केलेली की सदर ठेकेदाराशी तुम्ही बोला त्या बाबतीमध्ये काही बोलणे वगैरे झालेले आहे का?

**दिपक खांबित :-**

बोलणे झाले होते त्यांना आयुक्तांनी बोलवले होते त्यांनी ते रेट कमी करायला नकार दिला.

**शरद पाटील :-**

साहेब मच्छर सात दिवसांत कमी होणार होते ते झालेच नाही.

**चंद्रकांत वैती :-**

इतिवृत्तांत मंजुर करून घ्या.

**शरद पाटील :-**

मच्छरांचे काय?

**चंद्रकांत वैती :-**

आपण ते आल्यावर विचारु या. इतिवृत्तांत मंजुर करु या.

**प्रकरण क्र. २०९ :-**

दिनांक २४/१२/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १९० :-**

दि. २४/१२/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१० चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

सचिव साहेब आपण ते क्लिअर करु शकता की कुठले जाहिरात बोर्ड आणि कोणाचे पैसे वसूल झाले नाहीत. जास्तीत जास्त मला असे वाटते पॉलिटिकल लोकांचे असेल.

**दिपक खांबीत :-**

आपण मेजरमेंन्ट घेतांना ते बोर्ड होते परंतु बिल पाठविल्यावर त्यांनी बोर्ड काढून टाकले.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय आता जर आमचे खांबीत असे बोलत असतील तर माझा असा आरोप आहे तिथे बोर्डच नव्हते आणि त्यांचे त्या ठेकेदाराने बिल लावलेले आहे आणि ज्यांनी पैसे दिले त्यांचे कट केलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ही प्रक्रियाच संपूर्णपणे चुकलेली आहे आपण सरसकट सगळयांना जाहिरात कर आपण लावला आता मला असे म्हणायचे आहे की आपण परत याचे सर्वेक्षण करावे आणि त्याप्रमाणे करावे कारण हा वारंवार येणारा विषय आहे आणि पुन्हा एकदा सर्वे करुन त्याच्यामध्ये योग्य ती आकारणी करावी कारण काही लोकांचे बोर्ड अतिशय छोटे आहेत पण आकारणी अगदी चार चार हजाराची झालेली आहे आणि असे अनेक अर्ज आपण वेळोवेळी डिपार्टमेंटमध्ये आणलेले आहेत तर याची परत एकदा फेर पाहणी करून आपण योग्य ते जाहिरात कर आकारावेत म्हणजे पुन्हा पुन्हा त्यामध्ये आपल्याला हा विषय आणण्याची गरज पडणार नाही.

**मोहन पाटील :-**

या वर्षी आपण अर्थसंकल्पामध्ये जे उद्दीष्ट आपण गृहीत धरले होते. ते गृहित धरल्यानंतर मागच्या वेळेला तो विषय आपण आणला त्याच्यामध्ये जी तूट येणार आहे त्या तुटीसाठी आपण मंजुरी घेतली आणि त्याच्यानंतर हा विषय पुन्हा आलेला आहे जर पुन्हा असा विषय आला असेल तर त्याचे पूर्ण सर्वेक्षण पुन्हा तुम्ही करा. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी या ठिकाणी जो मुददा उपस्थित केला तो बरोबर आहे. अशा वेळी ज्या तुमच्या गोष्टी तुम्हाला आढळल्या अशा गोष्टी पुन्हा आढळणार नाहीत असे आपण सांगू शकत नाही, जर तुमच्याकडे तशा जाहिरात दराच्या तक्रारी पुन्हा आल्या ग्राहक आहेत त्यांच्या पुन्हा आणू शकाल. संपूर्णपणे सर्वेक्षण करा आपण एका तुटीला मागच्या वेळेला मंजुरी घेतलेली आहे मग संपूर्णतः मंजुरी देताना पुन्हा पुन्हा आला तर ही येणारी पुन्हा तुट आहे ही तुट भरून आणताना तुम्हाला कायदेशीररित्या अर्थसंकल्पामध्ये अडचण निर्माण होउ शकते. जर सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी मुददा मांडला असेल तर पुन्हा संपूर्णपणे सर्वेक्षण पुन्हा करून घ्या आणि पुन्हा एकत्र विषय घेउ या. हा ठराविक चार लोकांनी विषय आणला तर तुम्ही विषय पुन्हा आणणार. तर कृपया आपण अधिका-यांनी आपले सर्वेक्षण करावे. आणि विषय पुन्हा आणावा. पुन्हा तुट मंजूर करून दिलेली आहे. म्हणून सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी या ठिकाणी मुददा उपस्थित केला. त्या मुद्याशी मी सहमती दर्शवितो आणि पुन्हा आपण सर्वेक्षण करुन हा विषय आणावा असे माझे मत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील आणि सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जो मुददा उपस्थित केला आहे त्या मताशी मला वाटते सभागृहातील बहुतांश सदस्य सहमत असतील आणि ज्या पध्दतीने आज या ठिकाणी हा विषय आलेला आहे तर संपूर्ण सर्वे झालाच नाही. जो सर्वे झाला तो चुकीच्या पध्दतीने झाला होता. जिथे जिथे एक बोर्ड आहे तिथे चार चार बोर्ड आहेत. साईजचे काय नाही. मेजरमेन्टचे काय नाही मनात आला त्याप्रमाणे कर लावला आहे लोकांना नाहक त्रास दिला आहे आणि आता हे जे अर्ज आलेले आहेत. ते थोडेच आले संपूर्ण विषय एकत्र करून येउ दया नंतर मंजूरी घ्या

**शरद पाटील :-**

मंजुरीचे घेतच नाही. आता मंजुरीचा प्रश्न येत नाही. त्यांनी सांगितले की पुन्हा सर्वे करा. पुन्हा करुन घ्या पण ज्या ठेकेदाराने अकरा लाख रुपये घेउन गेला त्यानें सर्वेच चुकीचा केला आहे त्या अकरा लाख दिले त्याचा जबाबदार कोण?

**आसिफ शेखः-**

अटी शर्ती असतील तर त्या अटी शर्ती गृहीत केल्या असतील तर.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय मी तुम्हाला सांगतो ज्या दुकानाला मॅनेज करायचे असेल त्यांनी पैसे दिले त्या दुकानाचा त्या ठेकेदाराने मॅनेज केलेले आहे. आणि ज्यांनी पैसे दिले नाही त्यांनी त्याचे डबल बोर्ड लावलेले आहेत. हा माझा आरोप आहे. प्रत्येक वेळेला असेच जर ठेकेदार आपण देत असलो आणि असा सर्वे करून जात असतील तर ते चुकीचे आहे.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब हे जे ह्याच्यावरती बोर्डाचे जे टेन्डर ज्यावेळी देऊन चेक करायला पाठविले. प्रशासकीय राजवटीमध्ये एखादया त्या कंपनीचे मला नाव आठवत नाही. त्यांना जे या पध्दतीने त्या कमिशनवर हे सगळे रिपोर्ट काढायला सांगितला. त्यावेळी त्या रिपोर्ट मध्ये त्या लोकांनी त्याना वाटते जेवढे ते आपल्याला बिल वाढवून देतील तेवढे त्यांना जास्त पैसे मिळतील अशा बेसीसवर काहीतरी दिलेले. ते टेन्डर खोलून पहावे. त्यावेळी त्यांना कुठल्या बेसवर दिले आहे, प्रशासकीय राजवटीमध्ये ते काम झालेले आहे त्यावेळी त्याना कुठल्या पध्दतीने ते काम दिले आणि कशा पध्दतीने त्या लोकांनी केले आहे अतिशय चुकीच्या पध्दतीने केलेले आहे सगळ्या लोकांच्या आपल्याकडे तक्रारी आहेत त्यामुळे हे जे आहे. आपल्या नगरपालिकेच्या लोकांकडून रितसर सगळे व्यवस्थित सगळे चेक करायला पाठवावे आणि नंतर हा विषय घ्यावा.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय हा विषय तीन की चार वेळा इथे आलेला आहे मा. सभापती मोहन पाटील मागच्या वेळी होते तेव्हा पण हा विषय आला होता की, टंडन ॲण्ड असोसिएटने जो सर्वे केला होता. तो चुकीचा होता तेव्हा पण आपण विषय मांडला होता आणि फेर सर्वे करुन नंतर ज्या ज्या बोर्डला फी

लावायची असे त्या दिवशी ठरले होते. परंतु आपल्या ऑफिसरने ते वेदशेडचे जुने बिल जसेच्या तसे पाठवून दिले आणि तो विषय तसाच्या तसा राहिलेला आहे आणि ते प्रत्येक वेळी जे दहा दहा बारा बारा आणत राहिलो. तर त्यामध्ये एप्रिल पण जाईल. मी काय सांगतो तेव्हा पण झालेले आहे तुम्ही फेर सर्वे करा आणि नंतर हे सगळे करा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब एखादी गोष्ट आपण हयामध्ये म्हटले आहे. जी जाहिरात फी वसुल होण्याजोगी नाही अशा प्रकारे महापालिकेची कोणतीही फी अथवा कर अथवा येणे वसुल न होण्याजोगे असेल अशी रक्कम मा. स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लिखित करण्याची तरतूद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ जे कलम १५२ मध्ये आहे निर्लिखित जी करण्याची तरतूद आहे तर त्याचे काय प्रासिजर आपण फॉलो अप करतो उपआयुक्त मुख्यालय निर्लेखित करण्याची पध्दत काय?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता कोर्टातच निर्णय झालेला आहे, लावायचे नाही. कोर्टानेच आदेश दिलेला आहे. वेदरशेड आणि जाहिरात कर लावायचा नाही.

**अजित पाटील :-**

आपली पहिली वेदरशेड आणि शोकेसची १ कोटी २७ लाखाची मागणी होती त्यानंतर गव्हर्नमेंटने ९ जून २००३ रोजी जाहिराती विषयीचे नियम तयार केले. नियमानुसार शोकेस आणि ही वेदर शेड नव्हती. वेदर शेडचे टोटल ८८ लाख रुपये आपण ठरावाद्वारे कमी केले म्हणजे १ कोटी २७ लाखामधून ८८ लाख गेल्यानंतर ३९ लाख रुपयाची आपली मागणी झाली. ३९ लाख रुपये चालू वर्षाचे ३९ लाख रूपये गेल्या वर्षाचे असे मिळून ७८ लाख रूपयाची आपली मागणी आहे. ७८ लाखाची बिले शोकेस वगळून आपण पाठविली. जो सर्वे केला त्या सर्वेच्या आधारे जे मोजमाप घेउन त्या आधारेच आपण बिले पाठविली आहेत. प्रत्यक्षात बिले पाठविल्यानंतर लोकांच्या तक्रारी आल्या की सर्वे केलेल्या रिपोर्टमध्ये आमची चार बिले आहेत मग ते एक बोर्ड आहे. ८८ लाखाची आमची मागणी आजच्या तारखेला फिक्स झालेली आहे. आणि अशा तक्रारी आल्यानंतर आम्ही त्याची पाहणी केली चार बोर्ड प्रत्यक्ष नाही आहेत जागेवर एक बोर्ड आहे. आणि त्याचा पंचनामा केला. आणि त्याच्या बिलाप्रमाणे प्रत्यक्ष एक बोर्डाप्रमाणे कॅल्क्युलेशन केलेले आहे आणि एक बोर्डाची रक्कम संबंधित खातेदार भरायला अशीच माफी दिल्यानंतर तयार आहे. ८८ लाखापासून जी आपली मागणी आहे ती अशीच माफी दिल्यानंतर ८८ लाख रूपये वसूल होणारच नाही आहेत आणि जी वसुल होण्याजोगी रक्कम नाही. ती माफीचा प्रस्ताव ठेवलेला आहे. अशीच जर बिले पुढे ढकलली एक दिड महिन्यानंतर आपण सगळा सर्वे करणार आहोत आणि ही जर रक्कम वसुल केली नाही. तर येणारी रक्कम आहे ती आपल्या महापालिकेला मिळणार नाही. म्हणून एप्रिल महिन्यानंतर आपण सर्वांचा सर्वे व्यवस्थित करु आणि ॲक्च्युअली बोर्डाप्रमाणे मोजमाप घेउन बिल पाठवू या आणि आता जी ८८ लाख रुपयाची मागणी आहे. ती ऑलरेडी आपल्याला कमी केल्यानंतर २५-३०-४० लाख रुपये महापालिकेला येउ शकतील म्हणूनच हा प्रस्ताव ठेवलेला आहे आणि एप्रिलनंतर संपूर्ण सर्वे करुन ॲक्च्युअली बोर्डाप्रमाणे बिलाची आकारणी करू या म्हणजे येणारी रक्कम आहे ती पण जाईल .

**धनराज अग्रवाल :-**

आपण जर सारखा सारखा असा विषय आपला मी काय सांगतो तुम्ही हे एकदा नक्की करा आणि प्रत्येक व्यापारीचे जर हॅरसमेंट होत असेल इकडे आल्यानंतर तो फेऱ्याच मारायला लागतो.

**अजित पाटील :-**

जेवढ्या लोकांचे अर्ज आले त्या सगळया लोकांचा सर्वे झालेला आहे आणि त्यांचे राइट अपचे प्रस्ताव आम्ही ठेवलेले आहेत. जेवढयाचे पूर्ण झाले नाही. त्याचा प्रस्ताव ठेवला नाही. त्याच्यापुढे ठराव झाल्यानंतर त्याप्रमाणे आपण त्यांना कमी करु या.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय तुम्ही हा करुच नका. तुम्ही पुन्हा सर्वे करा. माझे तुम्ही ऐका. आणि मागच्या वेळेला ते पण झाले होते. त्याचे बरोबर म्हणणे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आता हे काय सांगतात की सर्वे केला तरी पेन्डीग राहिल. परत लफडे होईल. तर हे ज्यांचे ज्यांचे अर्ज येईल त्याना माफ करुन दया.

**अजित पाटील :-**

म्हणजे याच्या आधारे सर्वे येईल त्याना माफ करुन

**आसिफ शेख :-**

आपण आपल्या अधिकारात कसे माफ करु ? मला कळत नाही. एखादा कराबाबत महानगरपालिकेने बिल पाठविले. उपआयुक्त साहेब खुलासा विचारतो मी प्रश्न विचारला त्याचे उत्तर मिळाले.

**धनराज अग्रवाल :-**

आता जी भरायची आहे सुधारित करुन भरायची आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सभापती आणि सर्व उपस्थित नगरसेवक स्थायी समितीचे सभासद आपण याबाबत यामध्ये चर्चा केली. आपल्या चर्चेशी आम्ही निश्चितपणे सहमत आहोत की यापूर्वी आपण टंडन असोसिएट कंपनी यांच्याकडून संपूर्ण गावाचा सर्वे केला. आणि तो सर्वे केल्यानंतर आजच्या स्थितीला त्या ठिकाणी कोणत्याही तऱ्हेचे बोर्ड उपलब्ध नाही आहेत आणि ते बोर्ड उपलब्ध नसल्यामुळे जी किंमत आपण गेल्या अर्थसंकल्पात फिक्स केली आहे ती डिमान्ड जर कमी करायची असेल किंवा त्यांना आपण डिमान्डमधुन निर्लेखित करावयाचे असेल तर त्याला कायदेशीर प्रोसेस आहे. त्याला बिल जाणे जरुरी आहे बिल झाल्यानंतर त्यांनी ऑब्जेक्शन घ्यायला पाहिजे.ज्या लोकांनी याच्यामध्ये आक्षेप घेतलेला आहे. त्यांची एकूण सतरा लोकांची यादी सोबत याच्यासोबत जोडलेली आहे आणि ती सतरा लोकांची तीस हजार दोनशे बत्तीस रुपये एवढे आपल्याला निर्लेखित करावयाचे आहेत. त्यानंतर जेवढे काही निर्लेखित बाबत अर्ज येतील. त्याची शहानिशा आमच्या जाहिरात विभागाकडून केली जाईल आणि ती निर्लेखितचा प्रस्ताव निर्लेखित करण्याचे अधिकार स्थायी समितीलाच आहे आणि प्रत्येक वेळी तो विषय स्थायी समितीवर येणार आहे. कारण निर्लेखित करण्याचे अधिकार स्थ्ज्ञायी समितीलाच आहेत.

**असिफ शेख :-**

आम्ही तेच सांगितले. स्थायी समितीला अधिकार आहेत. आपण असे म्हणता.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

याला तुम्ही निर्लेखित करा.

**असिफ शेख :-**

तुम्ही निर्लेखित करायची जी पध्दत असते त्या पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. त्याला किती वेळा नोटिसा पाठविल्या किती वेळा बिले पाठविली. किती वेळा पंचनामा केला? खरच ती रक्कम वसुल होण्याजोगी आहे की नाही आपल्याला कसे माहिती पडले. कसा साक्षात्कार झाला? कारण हे सर्व मागच्या दोन वर्षात झाला.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

मी आपल्या शंकेचे फक्त निरसन करतो.

**आसिफ शेख :-**

निर्लेखित करण्याची फक्त पद्धत सांगा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. सभापतीसाहेब सर्वे झाला. बिले निघाली. बिले निघाल्यानंतर काहींनी बिलाचे आकडे बघून बोर्ड काढून ठेवले. ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे ही रक्कम भरावी लागेल. म्हणून बोर्ड काढून घेतले. काढून घेतले तर ते आता जे सतरा जणांनी अर्ज केले. त्याचे ठिक आहे. परंतु काही काही लोकांना जी बिले गेलेली आहेत. ते वर्षभर ते बोर्ड होते. तर त्यांची वसुली करावी लागेल, पण माफ करताना इथून पुढे नाहीत. अर्ज ज्यांनी ज्यांनी केला इथून पुढे लावलेले नाहीत इथून पुढच्या वर्षामध्ये त्यांना माफ होईल पण लोकांनी ज्यावेळेला आपली बिले पाहिली. स्केअर फुटावर तो गर्व्हर्नमेंटचा दर आहे. ते बोर्ड काढून घेतले हे कुठून भरायचे म्हणून, पण प्रत्यक्षात त्यावेळेला बोर्ड होते. आणि त्यामुळे हे त्यांच्याकडून भरून घ्यावे लागेल आणि मग इथून पुढे नाही तसे लिहून मग माफ करावे लागेल. म्हणजे याचा अर्थ बोर्ड नसताना आपण बिले दिली हे म्हणणे बरोबर नाही.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब ही बाब खरी असली तरी पण तुम्हाला सांगतो आमच्याकडे आलेले जे तक्रारदार आहेत. किंवा ज्यांची दुकाने आहेत त्यांचे बोर्ड छोटे होते पण त्यांची आकारणी अतिशय मोठया प्रमाणात करण्यात आलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

शासनाने ठरवून दिलेला दर आहे. तो जी.आर. आहे.

**चंद्रकांत वैती :-**

बोर्ड एवढा मोठा नाही तेवढी मोठी आकारणी आहे आणि तशाच लोकांची प्रकरणे आलेली आहेत.

**शिवमुर्ती नाईक :-**

तुमच्याकडे जी तक्रार आली, म्हणजे याचा अर्थ आम्ही टेप लावला तो चुकीचा आहे सर्वे केला तो चुकीचा आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सर्वच ठिकाणी नाही. पण काही ठिकाणी नक्कीच चुकीचे आहे

**शिवमुर्ती नाईक :-**

म्हणजे काही ठिकाणी असेल नाही असे नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की त्यांचे बोर्डच नाही म्हणून टॅक्स माफ करावा.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब तुम्हाला सांगतो कुठेच चार बोर्ड कुठल्या दुकानावार आता चला तुम्ही दाखवा कुठल्या दुकानावार चार बोर्ड आहेत एक किंवा दोन याच्यापेक्षा चार बोर्ड असणारच नाही. तुम्ही काय बोलता चार बोर्ड असेल म्हणून आम्ही लावला.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

मी आता चार बोर्डाचे कुठे बोललो?

**धनराज अग्रवाल :-**

चार बोर्डाची भाईंदरमध्ये कुठली दुकान आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

पण आता चार बोर्डाचा मी उल्लेख कुठे केला?

**याकुब कुरेशी :-**

आकारणी जी केलेली आहे चार चार पाच पाच बोर्डाची आकारणी केलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

एका दुकानावर चार बोर्ड आहेत.असे मी बोललो तरी कुठे?

**धनराज अग्रवाल :-**

इकडे चार-चार पाच-पाच बोर्डाचे बिल गेलेले आहे. आतमध्ये शोकेस आहे. त्याचे त्यांनी बोर्ड पकडले आहे. हे स्वतःचे कमिशन जास्त व्हावे म्हणून त्याने असे लफडे केलेले आहे.

**शिवमुर्ती नाईक ( मा.उपआयुक्त सो.):-**

ज्या ज्या वस्तूवर ॲडव्हरटाईज असते. त्या त्या वस्तुवर आकारणी करावी असे.जी.आर. मध्ये म्हटलेले आहे. आता कपाट लावला तिथे गोदरेज लिहीले असेल किंवा साहेब ऐकून तर घ्या माझे बोलून होऊ द्या. मग तुमचेही बोलणे ऐकतो ना.

**याकुब कुरेशी :-**

एखादे बिस्किटचे पाकिट असते. त्यावर नांव असते म्हणून ती जाहिरात झाली का?

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

बिस्किटे जी असतात ती डब्यात असतात. ती काय दिसत नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

डब्यावर नाव असते. त्याला तुम्ही जाहिरात कसे म्हणाल.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही जे ठरवले ते नक्की.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

मी ठरवले ते नक्की नाही. तुम्हीच ठरवणार आहेत. त्यामुळे ते ठरावाने मागच्या वेळेला कमी केले.

**याकुब कुरेशी :-**

साहेब आमचे तुम्ही ऐकून घ्या. नंतर तुम्ही सांगा तुम्ही हया पध्दतीने सांगता की ज्या गोष्टीवर कंपनीचे नाव आले. त्या कंपनीची जाहिरात आली. त्याच्यावर कर आकारणी करायची असा जी.आर. आहे. असे तुम्हीच म्हटले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

होते नंतर आपण मागच्या स्थायी समितीमध्ये कमी केले. मी तेच म्हणतो की कपाटावर काचेवर किंवा आतल्या वस्तूवर जे जाहिरातीचे नाव होते. त्यावरदेखील आकारणी करावी असे लिहीले होते. नंतर नवीन जी.आर. आला. जी.आर. आल्यानंतर आपण त्या जी.आर. च्या आधारे घेउन स्थायी समितीपुढे विषय मांडून तो कमी करुन घेतला. पण आपण जे म्हणतो की जे बोर्ड होते ते बिल गेल्यानंतर काही लोकांनी बोर्ड आणि वेदर शेड रक्कम बघून काढून घेतले वेदर शेड पण दुकानाच्या पुढे बांधलेले होते ते जे बिल गेल्यानंतर त्या बिलाचा आकडा बघून काही लोकांनी बोर्ड कमी केले आणि काही लोकांनी वेदरशेड काढून घेतले. त्यामूळे वेदरशेडवर पण मागच्या वेळेला कमी केले. कपाटावरच्या वेदरशेडवर पण मागच्या वेळेला कमी केले. आता फक्त दुकानाच्या बोर्डावरच लावायचा निर्णय घेतला. माझे तुम्हाला एवढेच सांगणे आहे की काही लोकांनी ही अमाउन्ट बघून बोर्ड काढून ठेवले. याचा विचार करुन आपण निर्णय घ्यावा

**आसिफ शेख :-**

तेच तर सभापती साहेब आम्ही सांगतो की आता टंडन कंपनीने सर्वे केला होता. त्या सर्वेचे समर्थन करतच नाही. सगळया लोकांच्या नागरिकांच्या व्यापा-यांच्या सगळयांच्या तक्रारी आहेत आणि सभागृहातील प्रत्येक सदस्यांची तीच भावना आहे की चुकीच्या पध्दतीने सर्वे केला बिले पाठविली आणि तुम्ही अकरा लाखाचे त्याला पेमेन्ट पण करुन टाकले मग त्याच्यावर काय ठेकेदाराने मनात आल्याप्रमाणे काम केले तुम्ही पेमेन्ट पण करुन टाकले म्हणजे त्याला काय वचकच राहणार नाही तुम्ही चुकीच्या पध्दतीने सर्वे केला त्याना नोटिस द्या. त्याचे पैसे वसुल करुन घ्या की, तुमचा सर्वे चुकीचा आहे म्हणून जनतेला वेठीस का देता? आमच्या बाजूला ग्रामपंचायतपासून मिलकीरामचे जुने गॅरेज आहे त्याला तीस हजाराचे बिल पाठवून दिले, जैन मंदिर रोडला सर्व व्यापारी वर्ग आहेत त्यांची पत्रे आपल्याकडे आहेत, आमच्या प्रभागातील सागर एम्पोरियम यांचे पत्र आपल्याकडे आहे, याचा या ठिकाणी काहीही उल्लेख नाही आहे चुकीच्या पध्दतीने सर्वे करायचा बिले पाठवून द्यायची लोकांकडून वसुली करुन घ्यायची. नाईकसाहेबांनी खुलासा करावा की एखादा कर आपल्याला निर्लेखित करायचा जो वर्षानुवर्षे वसुल होत नाही. त्याची पध्दत काय आहे? विधीवत पध्दत सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.):-**

१५२ सेक्शनमध्ये प्रोव्हीजन आहे की कोणताही कर निर्लेखित करायचा असेल तर स्थायी समितीला त्या संबंधिचे अधिकार आहेत. त्यासाठी प्रोसेस आहे की त्याला नोटिस देण्याअगोदर बिल दयायचे. ते बिल दिल्यानंतर त्याने १५ दिवसाच्या आत आक्षेप घ्यायचा की माझी वस्तुस्थिती अशी अशी आहे की माझ्याकडे चार बोर्ड नसून दोन बोर्ड आहेत तर त्या दोन बोर्डला त्याला लावायच्या आणि चार बोर्ड आमचा मनुष्य पाहणी करुन येणार, खात्री केल्यानंतर त्याचा रिपोर्ट येणार की, जागेवर मी प्रत्यक्ष जाउन अमुक तारखेला प्रत्यक्ष पाहणी केली आणि त्यामध्ये तिथे दोनच बोर्ड अस्तित्वात होते त्या ठिकाणी चार बोर्ड नाहीत दोन बोर्डला आपल्याला निर्लेखित करावे लागेल आणि ते निर्लेखित करायचे अधिकार १५२ सेक्शन खाली स्थायी समितीला आहेत आणि स्थायी समितीला हा विषय वेळोवेळी येणे योग्य वाटत नसेल तर त्या संबंधीचे अधिकार आयुक्तांना देण्यास आपण सक्षम आहात.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण ठराव क्रमांक १९० हा जुना जो होता. स्थायी समिती सभा २६/८/२००२ याच्यातील जेवढे जुने सदस्य आहेत. मला चांगले माहिती आहे यापूर्वी हा विषय सभागृहापुढे आला होता आणि आता जी चर्चा करता त्यापेक्षा जास्त चर्चा त्यावेळेला झाली आता जो २१० चा ठराव दिलेला आहे. त्या स्थायी समितीच्या पावर्स आपल्याकडे आहेत म्हणून या ठरावाच्या बाजूने मी बोलतो की हे प्रकरण आता निकालात काढावे. याला पुढे मी कारणे पण सांगतो. आता जी चर्चा झाली या शहरातील सगळेच

दुकानदार प्रामाणिक आहेत अशातला भाग नाही आहे. ब-याचशा दुकानदारांनी प्रशासनालासुध्दा अडचणीत आणलेले आहे. माझे २६/८/०२ ला जे प्रोसिडिंग झाले त्यामध्ये माझे जे प्रोसिडिंग झाले त्यामध्ये माझे जे ओपिनियन होते ते वाचा त्यावेळेला मी सांगितलेले आहे की लोकांनी सर्वे चालू झाल्याबरोबर स्वतःची बोर्ड काढून घेतले, मोठे मोठे बोर्ड काढून घेतले. सर्वे झाल्यानंतर परत लावले. अशाही काही केसेस आहेत. आता फक्त तुम्ही भांडता पण अशाही केसेस माझ्याकडे पुराव्यानुसार आहेत की, नगरपालिकेचा सर्वे झाला २१० बिल आले. नंतर त्यांनी मोठा होर्डिंग लावून टाकला कारण वर्षभर कोण चेक करायला गेलेले नाही. त्याच्यामध्ये प्रशासनाची लोकसुध्दा सामिल असतील. तो प्रायव्हेट कंपनीचा ठेकेदारसुध्दा सामील असेल. आपल्याला त्याच्याशी काही देणं घेण नाही. पण या विभागातील तो सुप्रीडेंट असेल त्यांनी काही ठराविक झोन पकडून त्याचे सुपरव्हिजन केले पाहिजे त्याचा रिसर्वे त्या सुपरवायझरने केला पाहिजे की, मी एखादया बिल्डिंगमध्ये गेलो. जरा सॅम्पल म्हणून चार दुकाने चेक करायची आहेत. याच्यामध्ये तुम्हाला या केस फेस होउ शकतात. आता मुंबई महानगरपालिकेच्या हाउस टॅक्सच्या जाहिरात कराबाबत एक केस त्या कोर्टामध्ये गेलेली होती. त्यांनी असा निर्णय दिलेला आहे की, दुकानाचे नामनिर्देशन केलेला म्हणजे नामसदृश्य दाखविणारा बोर्ड ही जाहिरात नाही. दुकानाचे नाव त्याला ठराविक साइज दिलेली आहे असे नाही की, मी पाच बाय पंचवीस फुटाचा पन्नास फुटाचा बोर्ड लावला आणि त्याला मी टॅक्स लावायचा नाही असे नाही. त्या निकालामध्ये स्पष्टपणे ते उल्लेखित केले आहे. मुंबईची कुठली तरी व्यापारी संस्था त्या कोर्टामध्ये गेलेली आहे आणि अशा काही पेपरच्या कटिंग असतील त्या मेहेरबानी करुन आपल्या डिपार्टमेंटला कटिंग काढून ठेवायला सांगा. त्यांची आपल्याला काही मदत होते. आपण कायद्याचे उल्लंघन करु शकत नाही. त्यात काही माहिती असल्या कारणाने त्याच्यामध्ये दुकानाचे ज्या बोर्डावर नाव आहे. ती तुम्हाला जाहिरात म्हणून पकडता येणार नाही. जे वरचे मेन नाव आहे जसे इमारत आहे उद्या तुम्ही इमारतीच्या नावालासुध्दा लावाल की, ही इमारतीच्या नावाने जाहिरात केली असे नाही आहे. ज्या मालकाच्या बंगल्याचे नाव किंवा दुकानाचे नाव ती जाहिरात होउ शकत नाही. ठाणे शहरामधील काही व्यापारी लोक या ह्याच्यावर कोर्टात गेली होती एक निर्णय लागला. परंतु त्याच्यावर अपिल झाले आहे. आणि आता ते अंडर अपिल आहे. कारण आता अपिल सबमिट झालेले आहे. त्यामुळे खालच्या कोर्टाची ऑर्डर क्वॅश झालेली आहे. खालच्या कोर्टाची ऑर्डर क्वॅश झाल्यानंतर वर अपिल ॲडमिट होते. ॲडमिट झाल्यानंतर खालची ऑर्डर इनफोर्समध्ये नसते. हा एक नियमाचा भाग आहे. दुसरी गोष्ट आता त्याच्यामध्ये आपल्याकडे जे हा बराच वाद झाला असा वाद त्यावेळेलासुध्दा झाला होता. मी त्या सभेमध्ये तुम्हाला एक प्रोसिजर सांगितली होती की, जो आपण आपला सर्वे करतो प्रायव्हेट जरी तुमच्या त्या एजन्टनी केला आपल्या नगरपालिकेचा कर्मचारी किंवा कोणी ॲथॉन्टिकल परसन त्या ठिकाणी पाठवा. संपूर्ण फॉरमेट घ्या. त्याच्याखाली एक कॉलम घ्या की, दुकानदाराचे मेजरमेन्ट केले. दुकानदाराचे नाव पत्ता आणि त्याचे किती स्केअर फिट आहे ते त्याची हरकत आहे की नाही तिकडेच लिहून घ्या. म्हणजे उद्या वाद नको म्हणजे तुम्हाला जे लिटीगेशन तयार होणार आहे तर ती पुढे होणार नाहीत त्याची हरकत असेल तर तो सांगणार हे माझ्यासमोर झालेले मेजरमेंट हयाची मला हरकत नाही. किंवा हरकत असेल तर तो सांगणार की हे मेजरमेंट चुकीचे आहे हयाच्यात हा हा बदल करावा. असे मी माझे मत मांडतो आहे . आता बघा या हयाच्यामध्ये आपल्या डिपार्टमेन्टने ही लिस्ट दिलेली आहे नाईकसाहेब तुम्ही जे बोलता ते मी त्या मिटींगमध्ये बोललेलो आहे कारण मला माहिती आहे कुठच्या कुठच्या ठिकाणी बोर्ड लागलेले आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे एका बाजुने सर्वे सुरू झाला की दुस-या बाजूने बोर्ड काढून ठेवायचे काम चालू झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी त्यावेळेला नावे दिलेली आहेत.

**शिवमुर्ती नाईक(मा उपआयुक्त साो):-**

आणि दुसरे आपल्याला जाहिरातीपासून नगरपालिकेच्या टोटल वर्षाला २९ हजार रुपये मिळायचे आणि आता आपण ७८ लाख रूपये मिळणार आहेत. परंतु हे जर प्रत्येक वेळेला असे आपण करायला लागलो तर एका बाजूने जर सर्वे सुरू झाला तर लगेच दुस-या बाजूने बोर्ड काढून ठेवतात आणि तुमचा सर्वे झाल्यानंतर बोर्ड लावतात. असे करायला पाहिजे की एका वेळेला सर्वे होउ शकणार

नाही, उदाहरण द्यायचे झाले तर आमच्या अतिक्रमणाची गाडी गेली की फूटपाथवर मांडलेला माल एका बाजूने उचलायला सुरू केले तर पुढचे दुकानदार सगळे दुकानात माल घेतात, त्यामुळे आपण जरी दररोज उचलायचे ठरविले तरी कुठल्या तरी बाजूने उचलायला सुरू केले, तर दुसऱ्या बाजूची लोक नगरपालिकेची गाडी आली म्हणून माल आत घ्यायला सुरू करतात. त्यामुळे आता जरी आपण सर्वे करायचे ठरविले तरी त्यावेळी एका बाजूने सुरू केले तर बोर्ड काढून ठेवला. त्यावर आता जरी चुकीचा सर्वे झाला असे आपण म्हटले तर ते नगरपालिकेचे अधिकारी आणि कॉन्ट्रॅक्टर पुन्हा त्यांनी सर्वे करुन दयावा. पण जर असे झाले तर काय करायचे आपण निर्णय घ्यावा एका बाजूने सर्वे सुरु झाला. पण दुसऱ्या बाजूने बोर्ड काढून टाकतात. ही वस्तुस्थिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्याकरिता माझी अशी सुचना आहे की पुढचे वाद न राहण्याकरिता खाली एक काउन्टर फाइल सारखे बनवायचे बोर्ड आहे नाही. बोर्डाची प्रत्यक्ष साईज काय आहे? ती लिहायची ती जर मान्य असेल तर दुकानदाराला त्याची तिकडे सही घ्या. जो ॲथॉन्टेकेटिव्ह परसन असेल तो, आता बघा ही लिस्ट दिलेली आहे या लिस्टमध्ये जे आपण आता अर्जदार दिलेले आहेत आपली एक चुक अशी झाली आहे या अर्जदाराने तुमच्याकडे रिडक्शनबददल म्हणजे त्याला अमाउन्ट कमी करण्याबददल किंवा काही माफीबददल जो काही अर्ज केला आहे. त्याची तारीख टाकलेली नाही आहे जर या अर्जदारांना दोन महिन्यांच्या वर जर झाले असतील तर त्या सेक्शननुसार ती माफी मिळणारच आहे. ह्याची एक तारीख की ह्या अर्जदाराचा अमुक तारखेला अर्ज आला ते कमीत कमी दोन महिन्यांच्या आतमध्ये निर्णय घेतला पाहिजे असे आपल्याला बंधन आहे ते काही यामध्ये तुम्ही टाकलेले नाही आणि हे सर्वस्वी स्थायी समितीचे अधिकार आहेत. आणि आपण आता हयाच्यावर निर्णय घेणे अगदी गरजेचे आहे त्यावेळी सन्मा. सदस्य मोहन पाटील होते आणि त्यांनी हा सगळा कच्चा अर्थसंकल्पाचा मसुदा तयार केला होता आणि त्याच्यामध्ये ही फिगर आपल्या बजेटमध्ये दिलेली आहे. आता जर आपण यावर निर्णय घेतला नाही. तर या काही प्रकरणाकरिता संपूर्ण थांबवू राहिल आणि त्याचा बजेटवर परिणाम होणार आहे आपणसुध्दा त्या बजेटच्या मिटींगला होता सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल पण होते. सर्व आपण बसलेलो होतो आणि त्याचे अंदाज आपण त्यामध्ये ठेवलेले होते. त्याचा जो सेट बॅक आहे. त्याबददल आपण काय करणार? त्याकरिता या मिटींगमध्ये हा जो लोकांनी दिलेला अर्ज आहे. तो मान्य करुन याचा निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे. असेही साठ दिवस झाले असतील तर त्यांनी तुमच्याकडे यायची पण गरज नाही. ॲस पर ॲक्ट त्यांचे म्हणणे लागूच होणार आहे. साठ दिवसात आपण निकाल घेतला नाही. असा याचा अर्थ होतो.

**चंद्रकांत वैती :-**

महापालिकेच्या जाहिरात विभागास सन २००३-०४ यासाठी जी बिलाची आकारणी केली आपण जाहिरात कर लावला तर काही ठिकाणी हे बोर्ड अस्तित्वात नव्हते. काही ठिकाणी जास्त दर लावला. अशा अनेक तक्रारी आल्या आणि या बाबत महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जाउन त्या ठिकाणी सर्वे केला पंचनामा केला आणि त्याची माहिती घेतली तर तशा काही लेखी तक्रारी आपल्याकडे आल्या तर त्यांच्या रकमा निर्लेखित करण्यासाठी आज आपण सभागृहापुढे हा विषय आणलेला आहे. तर आता पुन्हा आपण हा सर्वे करतो काही लोकांची बिले आपल्याला येतात. काही लोकांना ते मान्य आहे आणि ते मान्य करावे लागणार आहे. पण ज्यांनी ते मान्य केले त्यांचे आपण तसेच ठेवावे परंतु ज्यांच्या तक्रारी आहेत त्याबाबत सर्वे करावा आणि परत एकदा आपण पाहणी करणार आहोत. त्याच्यामध्ये आपण एक फॉरमॅट तयार केलेला आहे त्याच्यामध्ये आपण त्यांना ते मान्य आहे की नाही त्यांच्यासमोर ती मोजणी झालेली आहे. मग पुन्हा तो त्या प्रकरणातून माघार घेणार नाही आणि या अशा याच्यातून जी आपण ७८ लाखाची जे प्रयोजन केले होते तर त्यातून ज्या रकमा निर्लेखित होतील याच्यापुढे ज्यांच्या तक्रारी येतील. यांच्याही रकमा निर्लेखित करायच्या आहेत तर याबाबत आपण जो जाहिरात कर विभाग आहे त्या डिपार्टमेंटलाच हे अधिकार देवू. आणि आजच्या या जाहिरात कराचे प्रत्यक्ष बोर्ड नसताना ज्या रकमा लावलेल्या आहेत किंवा आहेत बोर्ड नसताना ज्या रकमा लावलेल्या आहेत किंवा आहेत बोर्ड पण ते अतिशय लहान आहेत आणि दुकानामध्ये आतमध्ये जाहिरात कर लावला होता तर या सगळया गोष्टींसाठी हे आपण सर्व अधिकार त्या जाहिरात कर विभागाला दयावेत आणि याबाबत निर्णय घ्यावा आणि पुढच्या वेळेला योग्य ती काळजी घेउन आपण पुढे अशा प्रकारे आपल्या रकमा निर्लेखित

करण्याची वेळ येउ नये किंवा कोणावरही जनतेवर अन्याय होउ नये याबाबत काळजी घ्यावी आणि या प्रकरणासाठी ही रक्कमा निर्लेखित करण्यासाठी मी मंजुरी देत आहे.

**रिटा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

निर्लेखित करण्याचे स्थायी समितीचे अधिकार आहेत आणि या संदर्भात तक्रारी असतील तर त्या तक्रारीचे निराकरण करण्याचे अधिकार मा. आयुक्त सक्षम आहेत. त्यांना दया.

**मोहन पाटील :-**

अधिका-यांना आपण दिले ठिक आहे पण रकमा निर्लेखित करायचे स्थायी समितीचे आहेत.

**असिफ शेख :-**

ते अधिकार स्थायी समितीचे आहेत. स्थायी समिती वापरणार.

**मोहन पाटील :-**

सर्वोच्च अधिकार आपण त्यांना द्यायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये उपआयुक्त दर्जाचा कोण अधिकारी आहे?

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर झाला.

**शिवमुती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आता सर्वे झाल्यानंतर बिले गेली आणि बिले गेल्यानंतर तो बोर्ड काढून नवीन मोठा बोर्ड लावला तर त्याला दुप्पट आकारणी करावी असे तुमच्यापुढे मांडतो. तुम्ही काय निर्णय घ्यायचा तो घ्या.

**आसिफ शेख :-**

प्रतिज्ञापत्र लिहून घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो):-**

नंतर आढळले मोठे बोर्ड लावले तर.

**धनराज अग्रवाल :-**

दुप्पट घ्यावा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, एका बाजूने जर सर्वे होत असेल दुस-या बाजूने जर बोर्ड काढत असतील तर अचानक एका दिवसांत सर्वे केला तर.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मी जे म्हणालो, या प्रकारात फॉर्म तयार केला आणि त्या दुकादाराची तिकडेच सही घेतली तर अर्धे वाद मिटतात.

**मोहन पाटील :-**

दुकानाचा बोर्ड ती जाहिरात आहे की नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो):-**

सर्वे करताना लावलेल्या बोर्डवर आकारणी झाली आणि नंतर मोठा बोर्ड लावला नंतर दुप्पट करायचा.

**आसिफ शेख :-**

प्रतिज्ञापत्र सहीनेच घेउन टाकायचे की एवढ्या एवढ्या साईजचे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो):-**

ज्या ठेकेदाराने सर्वे केलेला आहे . त्या ठेकेदाराने दुकानदाराचे किंवा दुकानात असलेल्या माणसाची सही घेतलेली आहे.

**असिफ शेख :-**

ब-याच ठिकाणी सही घेतली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सर्वे करताना बोर्ड काढले तर त्याचे तुम्ही काय करणार?

**मिलन म्हात्रे :-**

ह्या डिपार्टमेंटचे प्रमुख कोण आहेत? मागच्या वेळेला जेव्हा दुकानदार आले. तेव्हा आम्हाला चार दिवस फेऱ्या मारायला लागत होत्या. विजय पाटील, दोंदे असे वर खाली चालत होतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब सर्वे करताना बोर्डच काढले त्याचे तुम्ही काय करणार?

**रिटा शाह :-**

आता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले कुठल्याही दुकानवाल्यांनी स्वतःच्या दुकानाचे नाव ठेवले ती जाहिरात नाही. असे काही आहे का? मग त्या बोर्डाला तुम्ही मेजरमेंट घेणार नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

दुकानाच्या नावाला ॲडव्हरटाईजचे हे लावणार नाही.

**रिटा शाह :-**

मग जाहिरात कर कोणाला लावणार ?

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

दुकानाच्या नावाला ॲडव्हरटाईजचे हे लावणार नाही.

**रिटा शाह :-**

मग जाहिरात कर कोणाला लावणार ?

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

लावणार म्हणजे वस्तूच्या जाहिरातीसाठी उदाहरणार्थ हमाम साबण, ओनिडा.

**रिटा शाह :-**

मग तसे बॅनर लावले तर त्याला तुम्ही लावणार.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

त्याचे बोर्ड पण आहेत उदाहरणार्थ ओनिडा.

**रिटा शाह :-**

म्हणजे दुकानाच्या नावाला फलकाला नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

होय नावाला फलकाला नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हे जे नियम आहेत ते आम्हालादेखील माहिती नाही जेव्हा दुकानदार आमच्याकडे तक्रार घेउन येतात त्यावेळेला आम्हालाच नियम माहिती नसतात की आपल्या नगरपालिकेच्या त्यामध्ये काय नियम आहेत? एका साईडला शोकेसवर बोर्ड असतो. आणि त्याच्यानंतर साईडला त्या आयटमचे बोर्ड असतात जसे की पारले बिस्किट त्याचे पण त्यांनी ॲडव्हरटाईजमध्ये चार्ज केलेले आहे नियम ते आम्हाला दया म्हणजे आम्हाला माहिती पडेल.

**असिफ शेख :-**

ते क्लियर झालेच नाही साहेब.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुम्ही निर्णय घ्या.

**प्रकरण क्र. २१० :-**

जाहिरातीचे प्रत्यक्ष बोर्ड नसताना लावलेली जाहिरात फी वसुल न होण्या जोगी असल्याने निर्लेखित करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १९१ :-**

प्रकरण संदर्भातील मा. उपआयुक्त (मु.) यांनी सादर केलेला गोषवारा त्यासोबतची यादी वाचन करण्यात आली.

महापालिकेच्या जाहिरात विभागातर्फे सन २००३-०४ (थकबाकीसह) जाहिरात फी ची बिले संबधितांना बजावण्यांत आली आहेत. बजावण्यांत आलेल्या बिलामध्ये दर्शविलेले बोर्डाची संख्या, बोर्डाचे मोजमाप, चुकीचे तसेच जास्त असल्याबाबत, बिलाप्रमाणे प्रत्यक्षात बोर्ड नसल्या बाबत खातेदारांनी महापालिकेकडे जाहिरात फी च्या बिलाबाबत बऱ्याच तक्रारी करून सुधारित बिले पाठविण्याची मागणी केली आहे.

जाहिरात विभागाने तक्रारीनुसार प्रत्यक्ष पहाणी करून सादर केलेला अहवाल, बोर्ड विषयक पंचनामा याचा विचार करीता बिलामध्ये दर्शविलेल्या बोर्डाची संख्या व मोजमाप यामध्ये तफावत आहे. प्रत्यक्ष दुकानावर असलेले बोर्ड व त्यावरील जाहिरात ही बोर्डाच्या मोजमापानुसार ''जाहिरात फी '' साठी पात्र आहे.

बिलामध्ये दर्शविलेले बोर्ड प्रत्यक्ष जागेवर नाहीत, दुकानावर अस्तीत्वात नाही. त्यामुळे त्या बोर्डावर प्रत्यक्ष जाहिरात झालेलीच नाही. अशा प्रकारे जागेवर नसलेल्या व जाहिरात न झालेल्या बोर्डाची जाहिरात फी वसुल होण्याजोगी नाही. खालील नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणे खातेदारांनी तक्रार केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | खातेदाराचे नांव | खाते क्र. | बिला प्रमाणे मागणी | प्रत्यक्ष जागेवर असलेल्या मोजमापा नुसार व बोर्डा नुसार वसुल करणे योग्य रक्कम | प्रत्यक्ष जागेवर बोर्ड नाही/जादा मोजमाप यामुळे वसुल न होण्याजोगी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. किशोर पाटील | ए०८३६३ | ४७१० | ० | ४७१० |
| २. | भारत जनरल स्टोअर्स | ए०८९८८ | १२९६ | ७२० | ५७६ |
| ३. | संजय जोशी | ए०७७५५ | ३५६४ | ५०४ | ३०६० |
| ४. | विनलाबाई खिमराज | ए०८०३७ | २०८८ | ० | २०८८ |
| ५. | सातोस्कर | ए०५१३५ | १७७४ | ६३४ | ११४० |
| ६. | शेखर सी. सलियन | ए०९२९९ | २१६० | ७२ | २०८८ |
| ७. | संदिप गोम्स | ए०८८०३ | १६१२ | ८०६ | ८०६ |
| ८. | एम्मा एम्. जैन | ए०४७१२ | ७०८ | ९६ | ६१२ |
| ९. | एच्. के. भाजनिया | ए०८९८६ | १६८० | ९६० | ७२० |
| १०. | विजय भंडारी | ए०००१ | १८८६ | २८८ | १५९८ |
| ११. | वल्लम कलंगी | ए०८८२५ | ३८१६ | ५७६ | ३२४० |
| १२. | अग्रवाल | ए०८११६ | ३२४० | ७२० | २५२० |
| १३. | गोविंद परोडिया | ए०८५०६ | १२९६ | ० | १२९६ |
| १४. | नागेश सुखाराम उचगावकर | ए०७८८२ | ३६७२ | १८३६ | १८३६ |
| १५. | लक्ष्मणलाल डी. सोलंकी | ए०४५५६ | ४४५८ | २३५८ | २०७० |
| १६. | श्रीम. महेश्वरी | ए०८२२९ | २८८० | १४४० | १४४० |
| १७. | मोहमंद इंद्रिस खान | ए०२४८१ | ८६४ | ४३२ | ४३२ |

वर नमुद केलेली अहवालानुसार वस्तुस्थिती आहे. रकाना ६ मध्ये नमुद केलेल्या रक्कमा ह्या प्रत्यक्ष जागेवर बोर्ड नसल्याने जाहिरात न झाल्याने जादा मोजमाप ह्यामुळे वसुल होण्याजोग्या नाहीत अशा वसुल न होण्याजोग्या रक्कमा महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करण्यांस मंजुरी देण्यात येत आहे.

जाहिरात फी च्या बजावण्यांत आलेल्या बिलांसंदर्भात ब-याच नागरीकांच्या/दुकानदारांच्या अशा प्रकारच्या तक्रारी आहेत. या पुढे अशा येणा-या तक्रारी प्रकरणामध्ये वसुल न होण्याजोग्या रक्कमासंदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे त्या तक्रारदारांच्या रक्कमा निर्लेखित करण्यांस देखील ही सभा मंजुरी देत आहे.

अशा प्रकारे वसुल न होण्याजोग्या रक्कमासंदर्भात वरील प्रमाणे तातडीने कार्यवाही करण्यांत यावी

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २११ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

धोरण निश्चितच आहे की ज्या प्रभागामध्ये जी नगरसेवकांनी त्यांची नावे टाकायची कोणतेही काम असेल तर पण जसे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक लागले अश्वारुढ पुतळयाचे आणि त्याचे एक भव्य दिव्य स्वरुप आहे आणि एक विधायक मोठे काम आहे. त्या कामासाठी जी पध्दत आपण पूर्वीपासून अवलंबिली आहे सगळया नगरसेवकांची नावे आपण द्यायची तर मोठ्या कामांना तुम्ही नावे टाका. बाकी ज्या प्रभागामध्ये ज्या पध्दतीने कुणी लहानसहान कामे केली. समाज मंदिरे बांधली किंवा अन्य कुठली कामे केली ते ठिक आहे. पण जी कामे कोटीच्या घरामध्ये मोठी कामे आहेत. जी कामे समजा १०-१५-२० कोटी अशी मोठी विधायक कामे होतात. त्याच्यामध्ये तुम्ही सर्व नगरसेवकाचे एक जसे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आपण लावलेला आहे. तसे करुन घ्या. जसे नगरभवनला सुध्दा लावलेले आहे. त्या पध्दतीने आपण लावलेले आहे ते करा आणि लहानमोठी कामे असतात त्यामध्ये त्या प्रभागातील नगरसेवकांची नावे अत्यावश्यक आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

तसे सगळे बसुन ठराव करून दया.

**असिफ शेख :-**

करून दया म्हणजे आता निर्णयच घेतला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

कारण काय होते? नाव लावल्यानंतर परत तक्रारी वाढतात. सगळे गटनेते बसून मोठ्या कामाला ही ही नावे असावीत आणि छोटया कामाला वॉर्डातील ही ही नावे असावीत असा ठराव करून द्या म्हणजे वाद उपस्थित होणार नाही.

**याकुब कुरेशी :-**

हा विषय महासभेला घ्या. इकडे कशाला पाहिजे ही स्टँडिंग कमिटी कशासाठी आहे? तुम्ही बोलता सगळ्यांना बसवून ठरवा.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

सगळयांना नाही इथले गट म्हणजे प्रत्येकाचे गट असा ठराव करून द्या म्हणजे उपस्थित होणार नाही.

**याकुब कुरेशी :-**

दिला ना, आता सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले ना.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सर्व सभासद प्रामुख्याने हा विषय कशासाठी सभागृहामध्ये आला. याचे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण की अनेक नगरपालिकेचे आपण भूमिपूजन आणि उदघाटन करतो त्यावेळी वादाचा विषय निर्माण होतो. आणि या कायदयानुसार संविधानिक पदे कोणती आहे कोणते पदाधिकारी संविधानिक स्वरूपाचे आहेत? आणि कोणते असंविधानिक पध्दतीचे आहेत. या सर्वाचे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण की आपल्याकडे नेहमी वाद होतो आणि या वादातून आमचा प्रशासनाचा काही संबंध नसतो आणि त्यामध्ये प्रशासनाला विनाकारण हयाच्यामध्ये वाईटपणा घ्यावा लागतो. ही वस्तुस्थिती विचारात घेउन निश्चित असे त्यामध्ये हे व्हावे कारण की आता पूर्वी प्रभाग एक होता आता तीन प्रभाग झाले या प्रभागामध्ये अ,ब,क असे झाल्यामुळे एका विभागात तीन नगरसेवक राहतात. त्यामुळे तीन प्रभागाच्या तीनही नगरसेवकाचे नाव त्या वॉर्डातील त्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमावर येणे फार आवश्यक आहे कारण की, अनेक अशा प्रकरणामध्ये आमच्याशी संघर्ष झाला वाद निर्माण झाले त्यातून रुसवे फुगवे निर्माण होतात, हे नेहमी याच्यासाठी कारण आपण नगरपालिकेमध्ये सुध्दा असताना नगरपालिकेमध्ये सर्वांची नावे येत होती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या आपण येथे उल्लेख केला सर्वांचे नाव आहे. हीच पध्दत कायम ठेवायची. यामध्ये सेक्शन १९(अ) आणि १९(१) नुसार जी संविधानिक पदे आहेत त्या संविधानिक पदाधिका-यांचे नाव येणे

क्रमप्राप्त आहेत त्यानंतर मोठी जी एक दोन कोटीची कामे आहेत त्यावर सर्व नगरसेवकांचे नाव आणि प्रत्येक प्रभागाच्या नगरसेकांचे नांव अ, ब, क जे प्रभाग असतात त्या तिन्ही नगरसेवकांचे नाव यापुढे येणे जरुरी आहे आणि ते धोरण निश्चित करण्याकरिता आजच्या सभेवर ठेवले आहे.

**आसिफ शेख :-**

यामध्ये नजीकच्या काळात आपल्या प्रभाग समित्या स्थापन होणार आहेत. प्रभाग समितीचे अध्यक्ष पुन्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष परिवहन समिती असेल तर समितीचे अध्यक्ष जी संविधानिक पदे आहेत. त्या समितीच्या अध्यक्षाचे पद राहिलच ना. त्यांचे पण नाव राहिल जसे आपण प्रभागामध्ये तीन नगरसेवक आहेत. त्या तीन नगरसेवकाचे नाव.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

प्रभाग समितीचा अध्यक्ष हा संविधानिक पद नाही. आणि जर आपल्याकडे परिवहन आपण घेतल्यानंतर परिवहन प्राधिकरण जेव्हा होणार त्यावेळस त्याचा विचार आपण निश्चित करु. आज आपल्याकडे परिवहन प्राधीकरण नाही.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय याच्याकडे आमदार आणि खासदारांनी आपल्याकडे जी कामे केली असतील त्यासाठी आपण कुठला नियम वापरायचा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

त्यांच्या फंडातून म्हणून आपण नाव घालतो.

**अनंत पाटील :-**

त्याच्यासाठी महापौर किंवा स्थायी समितीच्या सभापतींचे नांव राहील का?

**मोहन पाटील :-**

पालिकेचे मसुदे असणारच जो फन्ड ज्यांनी दिलेला आहे, ज्या वास्तुला दिलेला आहे ती वास्तु मिरा भाईंदर महानगरपालिकेतच उभी राहते. म्हणून महानगरपालिकेचे पदाधिकारी संबंधित पदे त्यांनी सांगितले ते क्रमप्राप्त आहे. परंतु ज्यांनी फंड दिला म्हणून त्यांचेही नाव असणार.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय हे जर सर्व कॅटेगिरी आपण जर चार विभागात केली तर एकमध्ये जी मोठी कामे आता सांगितली त्यामध्ये संविधानिक पदे सर्व स्थानिक नगरसेवक स्थानिक आमदार स्थानिक खासदार आणि आमचे शिक्षणाचे आमदार त्याचे नाव असे तिन्ही याच्यात झाले पाहिजे जे त्यामध्ये मोठे काम आहे प्रभागाच्या कामामध्ये प्रभागाच्या नगरसेवकांचे नाव त्याच्यात आले पाहिजे तिसरे म्हणजे.

**मोहन पाटील :-**

आमदार, खासदार यांच्या नावाचा प्रश्न येतच नाही यामध्ये. तुम्ही जर त्यांना उद्घाटनाला बोलाविले तर त्यांचे नांव येईल. आमदार, खासदार या विभागाचे आहेत आणि एखादी वास्तु आपण उभी केली आणि त्याचे उद्घाटन महापालिका करते, स्वराज्य संस्था आहे ती. त्यांचा पैसा वापरुन ते काम करायचे असते. पण ज्या फंडातून जे पैसे त्यांनी दिले तर त्यांचे नांव आले पाहिजे. हे क्रमप्राप्त म्हणालो आपण. पण एखाद्या कामाचे उद्घाटन केले आपण आणि त्या उद्घ्झाटनाला सन्मा. सदस्यांना आपण आणले तर.

**धनराज अग्रवाल :-**

मी प्रस्ताव मांडतो. तुम्हाला वगळायचे आहे तर तुम्ही वगळा. नगरसेवक निधीमध्ये जे काम करतात ते त्या नगरसेवकांचे नाव आले पाहिजे आणि चौथे म्हणजे सार्वजनिक संस्थांचे जे काम करणार त्याच्यात पण ज्या विभागाचे काम होणार त्या विभागाच्या नगरसेवकाचे नाव आले पाहिजे आणि जे स्थानिक सांगितले ते बघा माझ्या हिशेबाने स्थानिक आमदार ,खासदार पदवीधर मतदारसंघ शिक्षक आमदार यांचे नाव आले पाहिजे.

**रिटा शाह :-**

साहेब याच्यामध्ये माझी एक सुचना आहे की कुठल्याही वास्तुचे आपण उदघाटन करायचे असेल त्याच्या कार्यक्रमाची संपूर्ण रूपरेषा इन्व्हीटेशन वगैरे प्रशासनानेच करायचे अशी माझी सुचना आहे कारण हयाच्यामध्ये कुठे वाद निर्माण होतो. एखादा नगरसेवक उठतो. स्वतः निमंत्रण छापतो स्वतः हे करतो त्यामधून हा वाद निर्माण होतो. मग हे काम प्रशासनाचे आहे आणि प्रशासनानेच करायला पाहिजे इन्व्हीटेशन वगैरे कोणाला बोलवायचे कोणाचे नाव टाकायचे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.) :-**

हे गैरसमज अत्यंत दूर करणे जरूरी आहे. आमदारांचा निधी असो किंवा नगरसेवकांचा निधी असो. हा निधी लाकोपयोगी कामासाठी शासनाकडून दिला जातो. नगरपालिकेचा निधी हा नगरसेवकांना दिला जातो. तो त्यांची खाजगी मालमत्ता नाही कारण की अनेक ठिकाणी मोठया अक्षरात नावात लिहून ठेवलेले आहे की, अमुक वस्तु, हे आपणाला तरी योग्य वाटते का?

**मोहन पाटील :-**

अजूनपर्यंत माझे कोणतेही काम सुरु झाले नाही. हा वेगळा भाग आहे. पण जो नगरसेवकांचा निधी त्या ठिकाणी वापरण्यात आला तर त्यासाठी नगरसेवकांचे नाव पाहिजेच.

**रिटा शाह :-**

साहेब माझी सुचना अशी आहे की, नगरसेवकांचे प्रभागामध्ये असेल तर नाव पाहिजे. आमदार किंवा खासदार कोणाचेही नाव द्यायला माझे ऑब्जेक्शन नाही आहे. पण जेव्हा नाव द्यायला आपण उद्घाटनाचा सोहळा करतो. ती सर्व प्रशासनाची जबाबदारी आहे. नाव किती मोठे ठेवायचे? किती लहान ठेवायचे? ते प्रशासनाचे काम आहे. ग्रॅनाईट लावायचे की कडप्पा लावायचा, ते प्रशासनाचे काम आहे. मग ती प्रक्रिया प्रशासनाने करावी अशी मी सुचना करते. नाहीतर एखादा नगरसेवक उठतो आपले नाव टाकतो, दुसरा नगरसेवक उठतो आपले नाव टाकतो, असे व्हायला नको आणि त्याची माहिती आपण स्थायी समितीपुढेच ठेवायची की, आम्ही असे ठरवले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय सभेपुढे आला हे फार चांगले झाले. कारण या शहरामध्ये काही ठिकाणी सुलभ शौचालये झाली ह्यामध्ये जे महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता पद स्थायी समिती हे वैधानिक दर्जाचे पद असे आपण यामध्ये नमुद केलेले आहे आणि यावर माझे असे म्हणणे आहे की, या शहरामध्ये अनेक पाट्यांवर राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांची नावे आहेत. नगरसेवक आमदार राहिले दूर, आता ज्या पक्षाच्या लोकांनी इकडे वाद घातला या पक्षाच्या लोकांच्या पदाधिका-यांची नावे आहेत.

**मोहन पाटील :-**

कसला वाद घातला? आणि कुठल्या पक्षाचे पदाधिकारी? तुम्ही विषय ट्विस का करता तुम्ही असे बोलू नका तुम्ही स्पष्ट बोला कोणी वाद घातला? तुम्ही काहीही बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

पुराव्याने बोलतोय.

**मोहन पाटील :-**

हा वाद नाही. चर्चा आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मोहन पाटील साहेब, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये पाटीच्या संदर्भामध्ये विषय आला. आमचे कुठेही हो वगैरे काही नव्हते. तीन नगरसेवकांचे नाव टाकायचे की नाही. मला माहिती पण नाही. आणि शुल्लक कामामध्ये मी कधी लक्षपण घालत नाही. आमच्या नेत्यांनी हे पण सांगितले आहे की सुलभ शौचालय, स्मशानभुम्या वगैरे यांची कधी उद्घाटने करायची नसतात आणि आम्ही ती करित नाही हे लक्षात घ्या. त्यावेळी त्या ठिकाणी पाट्या लागल्या म्हणून शौचालयाचे काम दिड महिना थांबबिले होते. त्यांनंतर महापौरांकडे हा वाद गेला. आम्ही कधीच गेलो नाही. त्याच्यानंतर सांगितले ही पाटी एवढी नाही एवढी बनवायची. त्यांच्याने तीन-चार सभा झाल्या. मी त्या वॉर्डचा नगरसेवक आमचे आणखी दोन नगरसेवक आम्हाला यामधील काहीच सांगितले नाही कुणी बोलावले नाही काही नाही यांच्या सभा होत होत्या. ते सर्व आम्हाला कळत होते पण त्या पाटी लागेल म्हणून त्या शौचालयाच्या जागा हया अशोक तिवारींनी तक्रार केली की जागा माझ्या नावावर आहे. जिल्हाधिका-याची जागा त्याच्या नावावर आहे असे झाले त्यामध्ये अनेक वेळा वाद झाला ज्या एरियातील लोकांना दिड महिनाभर संडासपासून वंचित रहावे लागले त्या एका पाटीमुळे. आणि आपल्या ह्याच्यातील नगरसेवकांनी पण याच्यात हस्तक्षेप केला की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचे त्याच्यामध्ये नको स्पष्ट सांगतो. नियमानुसार आम्हाला कोणी अडवू शकत नाही.

**मोहन पाटील :-**

असे कोणत्या नगरसेवकांनी तुम्हाला सांगितले तुमच्याकडे लेखी पुरावा आहे का? असे सांगू शकत नाही. कसे सांगू शकतील.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठिकाणी सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल गेले होते.

**धनराज अग्रवाल :-**

नाही नाही मी नाही गेलो.

**(सभागृहात गोंधळ)**

**याकुब कुरेशी :-**

वाटेल तसे खोटे आरोप करु नका. वाटेल तसे आमच्यावर खोटे आरोप तुम्ही कराल आणि ऐकायला सांगाल तर कसे ऐकणार? सन्मा. सदस्य धनराज अग्रवालच नाही म्हणत आहेत. सन्मा सदस्य मिलन म्हात्रे ज्या वॉर्ड मधून निवडून आले तिथून दोन वेळा मी निवडुन आलेलो आहे आणि ते गार्डन माझ्या काळात झालेले आहे. मी ते गार्डन मंजुर केलेले आहे त्यावर माझे नाव नसताना यांचे नाव आहे. आता मी कशाला वाद घालू. आम्ही वाद घालत नाही. तुम्ही मैताच्या मयत नेण्याच्या हातगाडीवर पण तुमचे नाव दिलेले आहे. तुम्ही उगीच कशाला बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

अहो, तुम्हांला माहिती आहे का? मोठी पाटी आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही वादाचे मुद्दे घेउ नका.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब बसा. मागे झाले संपले. बसा.

**आसिफ शेख :-**

असे जबाबदारीने बोला. पुराव्यानिशी बोला.

**मोहन पाटील :-**

मला बोलू द्या. माझा आक्षेप आहे. याचा अर्थ काय? आपण सभापती आहात. सभापतींच्या शब्दाचा मान दिला पाहिजे. तुम्ही सभापतीना बोलता आम्हाला बोलू द्या मग याचा अर्थ काय?

**मा. सभापती :-**

मी बोललो तुम्हांला बसा आता. हा विषय झाला. मागचा विषय काढून आपल्याला काय करायचे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो ते ऐकून घ्या. भविष्यामध्ये ज्या पाट्या.

**आसिफ शेख :-**

सभापतींनी बसा म्हणून रुलिंग दिलेली आहे

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे मला मोडू द्या.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब जी नगरपालिकेची प्रॉपर्टी आहे त्या प्रॉपर्टीला यांचे नाव कसे काय?

**मोहन पाटील :-**

वादाचा मुद्दा नाही आहे. तुम्ही बोलल्यानंतर वाद कसे निर्माण होतात? तुम्ही लोकांची नावे घेता ह्या नगरसेवकांनी केले, ह्या पध्दतीने केले, ह्या पक्षाने वाद घातला. हा पक्ष हे करतो? तुम्ही बोला पण तुम्ही वादांकित बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

वाद झाल्यानंतर वादांकित बोलावे लागते.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय आम्ही वाद केला का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ठराव मांडून होउ दे.

**मिलन म्हात्रे :-**

मी चुकीचे बोलत नाही माझ्या वॉर्डमध्ये नागरिकांना त्रास झाला आहे त्याबद्दल बोलतो. मी खोटे बोलत नाही. मा. महापौरांपर्यंत वाद गेलेला आहे.

**मा. सभापती :-**

पण ठराव आता नवीन आहे.

**मोहन पाटील :-**

हो मग तुम्ही महापौरांची गोष्ट महापौरांपर्यंत करा.

**आसिफ शेख :-**

पण आता विषय नाही आहे असा वाद घालवण्यासाठी.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या वॉर्डमध्ये पाटी कुणी लावायची?

**मा. सभापती :-**

आता मी दक्षता घेतो. याच्यापुढे असे होणार नाही.

**मोहन पाटील :-**

प्रोसिडिंगमध्ये हे संभाषण येता कामा नये.

**मिलन म्हात्रे :-**

माझे संभाषण आले पाहिजे. माझी हरकत नाही.

**मोहन पाटील :-**

आम्ही वाद केलेला नाही. आमचा जो राजकिय पक्ष आहे. तो विकास कामामध्ये अग्रेसर आहे. विकास काम करतात. आम्ही कोणाच्या वादामध्ये जात नाही आणि आम्ही कोणाला वादामध्ये आणत नाही. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल बोलले नाही. आले होते म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या पार्ट्यांना जर तुम्ही नियम लावत असाल तर आता जे राजकीय पक्ष.

**आसिफ शेख :-**

तुम्ही इकडे सभागृहाची दिशाभुल करता. आता तुम्ही बोलला सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आले होते.

**धनराज अग्रवाल :-**

मी कुठल्याही सुलभ शौचालयाकडे प्रस्तावाला गेलेलो नाही

**चंद्रकांत वैती :-**

म्हात्रे साहेब, सभापतींनी तुम्हांला सांगितले आहे तेव्हा तुम्ही बसा. बसून पुन्हा नंतर उठा, पण आता बसा. महापालिकेने जो विषय आणलेला आहे. महानगरपालिकेची विकास कामाची भुमिपुजन उद्‌घाटने समारंभाच्या नामफलकाबाबतचे धोरण निश्चित करणे यापूर्वी आपल्याच तक्रारी होत्या. महापालिका आपल्या फन्डातून ही कामे करित असते आणि काम करताना मा महापौर मा. उपमहापौर स्थायी समितीचे सभापती त्या प्रभागाचे तीन नगरसेवक यांची नावे त्या त्या नामफलकावर पाहिजे या व्यतिरिक्त आपण जे मंत्री, आमदार, खासदार यांना कोणाला त्या कार्यक्रमासंदर्भात बोलवणार असू तर त्यासाठी आपण त्याचींही नावे टाकली पाहिजे. आमदार, खासदार फंडातील जी कामे असतील त्यावर त्यांचे नांव निश्चित टाकले पाहिजे. मात्र या नगरसेवकाव्यतिरिक्त इतर कोणाची पदाधिकाऱ्यांची किंवा पार्टीच्या कार्यकर्त्यांची नावे निश्चितच त्या बोर्डावर नको आणि कोटीच्या वर असलेली जी कामे असतील त्यामध्ये संपूर्ण नगरसेवकांच्या नावाचे नामफलक लागले पाहिजेत. अशा प्रकारे हे नामफलकाचे धोरण अवलंबावे असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव झालेला आहे माझी उपसुचना आहे नोदवून घ्या प्रत्येक ह्याची पाटी, त्याची साईज तुमच्याकडे पाहिजे. रेंडरिंगची साईज पाहिजे सिटी इंजिनिअर आपल्याकडे नियुक्त केलेले आहेत. ठराविक पाटी, शाळांना कुठली पाटी लागणार ह्याची साईज, सुलभ शौचालयाला कुठली पाटी लागणार त्याच्या साईजेस, बगीचे त्यांना कुठल्या पाट्या लागणार त्यांच्या साईजेस तुम्ही ठरवून घ्या. माझे

एकच म्हणणे आहे की, मी जे बोलतो त्याला काहीतरी तथ्य आहे. त्या ठिकाणी मी पाट्या वाचलेल्या आहेत. त्याच्याने पुढे वाद किंवा भांडणे, मारामाऱ्या होण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांच्या अध्यक्षांच्या वगैरे नावे त्यामध्ये आहेत, ती नसावीत असे माझे स्पष्ट मत आहे. माझ्या पक्षाचे मी कोणचेही नाव घेणार नाही

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी याच्यामध्ये एक उपसुचना करतो. जे कोटींच्या वरची जी कामे आहेत त्यामध्ये सर्व स्थायी समितीच्या लोकांची नावे यायला पाहिजेत. एक वेगळी पार्टी यायला पाहिजे आणि जे नगरसेवक निधीतून काम होते तर त्या नगरसेवकाचे नांव पाहिजे.

**मोहन पाटील :-**

त्या नगरसेवकाचे नाव पाहिजे, मोठे नांव लावा, हरकत नाही. नगरसेवकांचा निधी आहे

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मी जे मघाशी बोलत होतो त्यामध्ये आता कोणीही बोलेल मी त्या ठिकाणी नव्हतो पण त्यावेळेची तक्रार आपल्या नगरपालिकेत दाखल झाली आहे. आपल्या बांधकाम विभागाला त्रास झाला आहे. महिनाभर हे प्रकरण चालू होते. पोलिस स्टेशनला तक्रार झालेली आहे.

**प्रकरण क्र. २११ :-**

महानगरपालिकेची विकास कामाची भूमीपुजन व उद्घाटने समारंभाचा नामफलक बाबतचे धोरण निश्चित करणेबाबत.

**अनंत पाटील :-**

माझी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि आताचे लोकसभा अध्यक्ष आहेत, त्यांनी भुमिपुजन केले आहे. जर उद्घाटनाचा सोहळा असेल त्यावेळी मनोहर जोशींना निमंत्रण द्याच परंतु त्याचे सुध्दा भुमिपुजन केल्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**ठराव क्र. १९२ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Anaok ivakasa ivaYayak kamao mahanagarpailakokDUna krNyaaMt yaotat. ivakasa kamaaMcaI BaUmaIpUjana va ]d\GaaTna samaarMBa yaasaMbaMQaI saat%yaanao pdaiQakarI va nagarsaovakaMkDUna naamakrNa paTIva$na vaad inamaa-Na haotao. vaadamaQyao ivanaakarNa p`Saasanaalaa laaokp`itinaQaI kDUna daoYa idlaa jaatao. vaastivak kaoNa%yaahI kaya-Ëmaacao Aayaaojana krtanaa krNyaapUvaI- naamakrNa paTIvar mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 19¸ 19³A´¸ 19³1´ naUsaar mahapaOr¸ ]pmahapaOr¸ saBaagaRh naota¸ ivaraoQaI pxa naota¸ va klama 21 naUsaar saBaaptI¸ sqaayaI saimatI ho pd vaOQaainak djaa-cao pd Aaho. %yaamauLo sadrcyaa vaOQaainak pdaMcaI naaMvao naamakrNa flakaMvar AsaNao Ëmap`aPt Aaho. tsaoca jyaa p`BaagaamaQyao ]d\GaaTna vaa BaUmaIpUjana samaarMBa haotao %yaa p`BaagaatIla yaaca AiQainayamaacyaa p`krNa 2 cao klama 5 naUsaar mahanagarpailaka p`BaagaamaQaUna bahusadsyaIya pQdtInao ekaca p`Baaga tIna ikMvaa caar sadsya inavaDUna Aalaolao Aahot. %yaaMcaI naaMvao hI naamakrNa paTIvar AsaNao AavaSyak Aaho. Anaok ]d\GaaTna samaarMBaamaQyao pdaiQakarI va nagarsaovakaMcaI naavao naamakrNa flakavar

nasalyaanao p`Saasanaasa ivanaakarNa AaraopÀp`%yaaraop k$na daoYa idlaa jaatao.

p`SaasanaakDUna Aalaolyaa p`stavaacaa ivacaar krta mahanagarpailakocyaa kaoNa%yaahI BaUmaIpUjana¸ ]d\GaaTna kaya-Ëma Aayaaoijat krtanaa inamaM~Na pi~ka va naamakrNaacaI paTI yaavar KalaIla maanyavaraMcaI naavao Asaaivat.

1´ maa.mahapaOr
2´ maa.]pmahapaOr
3´ saBaaptI¸ sqaayaI saimatI
4´ saBaagaRh naota
5´ ivaraoQaI pxa naota
6´ p`BaagaatIla tInaÀcaar hI nagarsaovakaMcaI naavao
7´ Aayau@t

tsaoca AamadarÀKasadar inaiQatUna kolaolyaa kamaaMcyaa ]d\GaaTna flakavar saMbaMiQat AamadarÀKasadar yaaMcaI naavao ilaihNyaat yaavaIt. $.1.00 kaoTI rkmaocyaa varIla kamaaMcyaa ]d\GaaTna flakavar sava- nagarsaovakaMcaI naavao ilaihNyaat yaavaI.

varIla pdaiQakarI va AiQakarI yaaMcaI naavao p`%yaok ivakasa kamaacyaaÀnagarsaovak inaQaIcyaa inamaM~Na pi~ka va naamakrNa flakavar ilaihNyaat yaavaIt. p`Saasanaanao yaabaabat dxata GyaavaI va sava- nagarsaovak¸ pdaiQakarI yaaMnaa sauQda yaa baabat Avagat kravao. Asaa zrava parIt krNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण २१२ चे वाचन केले)

**मोहन पाटील :-**

आदरणीय लोकसभेचे सभापती यांचे नाव राहिल भुमिपुजन त्याच्या हातून झाले आत जो विषय क्र. २१२ आलेला आहे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी जीप ऑटो रिक्षा मंडप खुर्च्या टेबल साउन्ड स्पिकर आणि ध्वनिक्षेपक यंत्र इत्यादी भाडयाने घेतलेल्या निविदनाबाबत जो विषय आला तो अवलोकनाचा विषय आहे त्याला मंजुरी देत आहोत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा जरी अवलोकनाचा विषय असला तरी याचे भाव जास्त आहेत हे नोंदवा

**चंद्रकांत वैती :-**

आयुक्तांनी दिलेले ते अवलोकन आहे

**हॅरल बोर्जीस :-**

त्यामध्येच आमचा विरोध नोंदवा.

**मोहन पाटील :-**

उपसुचना आणि विरोध त्यामध्ये येत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेबांनी आपल्या अखत्यारित ते मंजुर केलले आहे आपल्याला अवलोकनार्थ दिले आहे

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब जो हा विषय क्र. २१२ केला त्याचे वाचन करून कायम करा. कारण आता लगेच आचार संहिता लागणार आहे पाटया वगैरे बनवाव्या लागतील तुमचा लगेच इफेक्ट लागला पाहिजे वाचन करुन घ्या पुर्नवाचन करुन तो कायम करण्यात आला आहे असे वाचन करा.

**आसिफ शेख :-**

ठराव झालेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

अवलोकनामध्ये ठराव कशाला पाहिजे?

**मिलन म्हात्रे :-**

आता तुम्ही तो कायम करा. म्हणजे उदयापासून त्याचा इफेक्ट लागू पडेल. एवढे शांततेने घ्या

**असिफ शेख :-**

आता अवलोकनासाठी विषय आलेला आयुक्त साहेबांनी आपल्या अखत्यारित मंजुर केला सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठराव मांडला. आपण मंजुरी देऊन टाकली. प्रशासनाला काळजी आहे. आपण आता मंजुर केले.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मी नियमानुसार बोलतो नियम कशासाठी बनविले? नियमावली कशासाठी बनविली? त्याचे सभागृहात वाचन झाले पाहिजे. तुमच्या अकलेनुसार काम झाले नाही पाहिजे.

**मोहन पाटील :-**

असे कसे. सभापती महोदय आपण रुलिंग द्या.

**आसिफ शेख :-**

कोणाची किती अक्कल ते तुम्ही कोण सांगणार? सभापती बसले आहेत. सभापतींनी मंजुर केले, संपले काम. पुढचा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कशाला मध्ये बोलता पुढे करा म्हणून

**आसिफ शेख :-**

विषय चालू असताना तुम्ही मध्ये मध्ये बोलता

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण या नियमाशी अतिशय परिचीत आहात की, मा. आयुक्तांनी हा विषय अवलोकनार्थ ठेवलेला असतो. त्यावेळी आपल्या फक्त माहितीसाठी तो विषय असतो याच्यामध्ये आपल्या ठरावाची आवश्यकता नसते. आतापर्यंत आपण अनुभवी आहात. एक वर्ष आपण अतिशय चांगले काम केलेले आहे. जेंव्हा विषय वाचला तेंव्हाच त्या विषयाचे वाचन झाले आणि हे सभागृहाला पुरेसे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा, बायलॉजमध्ये जी तरतुद आहे. मी काय म्हणते ते परत एकदा ऐका.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण हे जे करतो ते बायलॉजला अनुसरुन करतो आहे. त्याच्यामुळे ते त्याच्यामध्ये ओघानेच येते.

**मिलन म्हात्रे :-**

बघा, मी वाचून दाखवू का?

**चंद्रकांत वैती :-**

हरकत नाही.. आपल्याशी सगळे सदस्य सहमत आहेत. कोणाचाही विरोध नाही. हे बायलॉज प्रमाणे चालते.

**मिलन म्हात्रे :-**

एवढयात विषय वाचून असता.

**चंद्रकांत वैती :-**

त्यांनी विषय वाचला.

**मिलन म्हात्रे :-**

पुर्नवाचन करायचे आहे. सभापती साहेब आपण यावर काहीतरी बोला. नंतर आपण अडचणीत येणार आहात. परत त्याला महिना दिड महिना महिना लागतो हे बघा स्थायी समितीने घेतलेला कुठलाही निर्णय कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्यास शिवाय त्वरित कार्यान्वित करणे आवश्यक असते.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्या ठरावाचे वाचन करु दया.

**मोहन पाटील :-**

वाचन करायचे म्हणजे नक्की काय करायचे? विषय तो आला आहे. तो ठराव कोणी केला?

**आसिफ शेख :-**

ठराव करणारा सुचक आणि अनुमोदक बोलतो. हे संपूर्ण झालेले आहे. पुन्हा पुन्हा तेच तेच काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मी जे बोलतो ते शांतपणे ऐकून घ्या . माझी तुम्हाला विनंती आहे. वाद करु नका. सभापती साहेब स्थायी समितीने घेतलेला कोणताही निर्णय कार्यवृत्त कायम होण्याची वाट बघितल्याशिवाय त्वरित कार्यान्वित करणे आवश्यक असेल त्याबाबत ज्या सभेत जो निर्णय घेण्यात आला असेल त्या सभेत महानगरपालिका सचिवांकडून असा निर्णय अंतर्भूत असणारा ठराव वाचून दाखविण्यात येईल. अशा रितीने वाचून दाखविण्यात आलेला ठराव कायम करण्यात आल्याचे समजण्यात येईल. पुढिल सभेत कार्यवृत्त कायम करण्यापूर्वी तो कार्यान्वित करता येईल. आणि आता जो आपल्याला पाटीचा ठराव आलेला आहे. आचारसंहिता कधीही लागू शकते. त्यामध्ये एक महिन्यापेक्षा काळ जाऊ शकतो. तेव्हा परत वाचून तो कायम करा. माझी एवढी विनंती आहे.

**चंद्रकांत वैती :-**

हा ठराव जसा आहे तसा मी मांडला. न वाचता मांडला.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर आहे. पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. २१२ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

पल्स पोलिओ लसीकरणे मोहिमेसाठी जीप, ऑटो रिक्षा, मंडप, खुर्च्या, टेबल, साऊंड स्पिकर आणि ध्वनी क्षेपक यंत्र आदी भाड्याने घेतल्या कामाच्या निविदा बाबत.

**ठराव क्र. १९३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०४/०१/२००४ व दि. २२/०२/२००४ रोजीच्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिम तसेच इंन्टेसीफाईड पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत लसीकरणाचे एकुण १९३ केंद्र असुन सदर केंद्रावर ३२ पर्यवेक्षक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर्स इत्यादी एकुण ४० अधिकाऱ्यांना लसीकरणाच्या दिवशी सर्व केंद्रावर लसी पोचविणे, केंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अल्पोपहारसाठी भत्ता देणे, तसेच लसीकरणाचा कार्यक्रम संपल्यावर व्हॅक्सीन कॅरीअर जमा करणे इत्यादी कामी जीप / रिक्षा वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आय.पी.पी.आय. साठी घरोघरी जाऊन लस देणे कामी जीप रिक्षांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर मोहिमे बाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे याकामी ध्वनी क्षेपणासह घोषणा देण्या करीता व रिक्षा ध्वनी क्षेपक आणि साऊंड स्पिकर द्वारे नागरीकांमध्ये मोहिमे बाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी केंद्र उभारण्यास जागा उपलब्ध नसते आशा ठिकाणी मंडप बांधुन टेबल खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली होती.

सदर कामाची जाहिर निविदा सुचना दि. ०५/१२/२००३ रोजी दै. लोकमत व दै. सुरजप्रकाश मध्ये प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता दि. १७/१२/२००३ रोजी खालीलप्रमाणे निविदाकारांनी आपले दर सादर केले आहेत.

१) पल्स पोलिओ लसीकरण कामी जीप, ऑटो रिक्षा, ध्वनी क्षेपक यंत्र इत्यादी.

| **अ.क्र** | **निविदाकाराचे नाव** | **दर प्रती दिवस प्रती नग** | | |
|---|---|---|---|---|
| | | **जीप बंद बॉडी** | **ऑटो रिक्षा बजाज** | **साऊंड स्पिकर व ध्वनी क्षेपक यंत्र** |
| १ | मे. राज टूर ॲन्ड ट्रॅव्हल्स | रु. ७९८/- प्रती दिवस प्रती नग | रु. ५७४/- प्रती दिवस प्रती नग | रु. ५००/- प्रती दिवस प्रती नग (बॅटरीसह) |
| २ | मे. विना ट्रॅव्हल्स | रु. ७९८/- प्रती दिवस प्रती नग | रु. ५७४/- प्रती दिवस प्रती नग | रु. ५००/- प्रती दिवस प्रती नग (बॅटरीसह) |
| ३ | मे साईसिध्दी ट्रॅव्हल्स | रु. ८८०/- प्रती दिवस प्रती नग | रु. ४८०/- प्रती दिवस प्रती नग | रु. ११२०/- प्रती दिवस प्रती नग (बॅटरीसह) |
| ४ | मे. सिताराम ट्रॅव्हल्स | रु. ६५१/- प्रती दिवस प्रती नग | रु. ३११/- प्रती दिवस प्रती नग | रु. ३११/- प्रती दिवस प्रती नग (बॅटरीसह) |

वरीलप्रमाणे निविदाकारांनी सादर केलेले दर हे प्रती नग प्रती दिवस (१२ तासा करीता) असे असून वरीलप्रमाणे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेले दर जीप गाडी बंद बॉडी रु. ६५१/- प्रती नग प्रती दिवस, ऑटो रिक्षा बजाज रु. ३११/- प्रती नग प्रती दिवस, स्पिकर व ध्वनी क्षेपक यंत्र रु. ३११/- प्रती नग (बॅटरीसह) प्रती दिवस हे दर सर्वात कमी आहेत.

२) पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी मंडप उभारुन प्लास्टिक खुर्च्या व टेबल पुरवठा करणे.

| **अ.क्र** | **निविदाकाराचे नाव** | **दर प्रती दिवस प्रती नग** | | |
|---|---|---|---|---|
| | | **मंडप (१० × १०)** | **प्लास्टिक खुर्च्या** | **टेबल** |
| १ | मे. नामदेव पवार | रु. २५००/- प्रती मंडप प्रती दिवस | रु. २०/- प्रती खुर्ची प्रती दिवस | रु. ५०/- प्रती टेबल प्रती दिवस |
| २ | मे. शागीर्द डेकोरेटर्स | रु. २८००/- प्रती मंडप प्रती दिवस | रु. २५/- प्रती खुर्ची प्रती दिवस | रु. ७५/- प्रती टेबल प्रती दिवस |
| ३ | मे. द्वारका डेकोरेटर्स | रु. ३०००/- प्रती मंडप प्रती दिवस | रु. ३०/- प्रती खुर्ची प्रती दिवस | रु. १००/- प्रती टेबल प्रती दिवस |

वरील प्रमाणे निविदाकाराने सादर केलेले दर हे प्रती नग प्रती दिवस असुन वरीलप्रमाणे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. नामदेव पवार यांनी मंडप (१० × १०) करीता रु. २५००/- प्रती मंडप प्रती दिवस, प्लास्टिक खुर्च्या रु. २०/- प्रती नग प्रती दिवस प्रती दिवस व टेबल रु. ५०/- प्रती नग प्रती दिवस हे दर सर्वात कमी सादर केले होते.

मात्र सदर दराची बाजार भावाशी तुलना करीता सदरचे दर जादा असल्याने आरोग्य विभागाने दि. १९/१२/२००३ मनपा/आरोग्य/४५३/२००३-०४ अन्वये उक्त दर कमी करणे बाबत निविदाकारने पत्राने कळविले होते. त्यानुसार दि. २०/१२/२००३ रोजी समक्ष चर्चा करुन वाटाघाटी केली असता निविदाकाराने पुढीलप्रमाणे मंडपा करीता (१० × १०) रु. २०००/- प्रती मंडप, खुर्ची रु. ११/- प्रती नग, टेबल रु. ३५/- प्रती नग या दरात पुरवठा करण्यास मान्य केले व तसे लेखी पत्राद्वारे महानगरपालिकेस कळविले आहे. तरी वाटाघाटी नंतर आलेल्या दरानुसार संबंधीताची निविदा मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली होती. सदर प्रस्तावास व निविदेस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**
जे नगरसेवक आहेत. त्यांचेच नगरसेवक निधीमध्ये येईल.

**चंद्रकांत वैती :-**
निधीचा नाही. प्रभागातील कामाचा आहे

**मा. सभापती :-**
एकत्र सहभागी नसतील तर काय करणार?

**आसिफ शेख :-**
नगरसेवक निधीमध्ये ज्या नगरसेवकांच्या निधीतून जे काम होईल त्याचे नाव तर मोठया अक्षरात राहिल. पण त्याच्याबरोबर दोन्ही नगरसेवक सहकारी असतील त्याची नावे राहतील. आताच महाराणा प्रताप उद्यानामध्ये फाउन्टनचे उदघाटन झाले तर सन्मा. सदस्य महेंन्द्रसिंग चौहान यानी स्वतःचे नाव टाकले. त्यासोबत सन्मा. सदस्या रिटा शाह आणि सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचे नांव टाकले. जरा चांगला आदर्श घ्या. सगळे आपले नगरसेवकच आहेत, सहकारीच आहेत त्यामुळे वादविवाद कशाला करा आणि बहुउद्देशीय प्रभाग आहे. त्यामुळे नियम यायलाच पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**
याच्या ज्या नगरसेवकांच्या निधीतून हे काम करण्यात आले. आणि सोबत दोन नावे टाकायला काही हरकत नाही.

**मोहन पाटील :-**
ते त्याच्यावर अवलंबून आहे.

**मा. सभापती :-**
ठराव क्र. २१३ मंजूर झाला

**मिलन म्हात्रे :-**
नगरसेवक निधीचे तुम्ही क्लिअर करा.

**मा. सभापती :-**
एका वॉर्डमध्ये तीन नगरसेवक असतात. मग निधीचे काम वेगवेगळे करणार का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**
महाराणा प्रताप उद्यान हा सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांच्या वॉर्डमध्ये सन्मा. सदस्य रिटा शाह आणि सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांचे पण नाव टाकले.

**जोजफ घोन्सालवीस :-**
पण का? तिघांची संमती नसेल तर.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**
हा निधी कोणाचाही वैयक्तिक निधी नाही आहे. प्रभाग समिती झाल्यानंतर हा निधी...

**जोजफ घोन्सालवीस :-**
जो निधी वापरतो त्याचे तरी काहीतरी करायचे.

**आसिफ शेख :-**
एक कोटीच्या वर असेल त्यावर सर्व नगरसेवक.

**मोहन पाटील :-**
एखाद्या पार्टीचा नगरसेवक एखाद्या पक्षामध्ये आहे. आता मा. शरद पवार नवी मुंबईला एका दालनाचे, एका कला केंद्राचे उद्घाटन झाले, तेंव्हा आले होते. त्यावेळी उपमहापौर रमाकांत म्हात्रे आहेत त्यांनी अशी मागणी केली की, अशा वेळी असा प्रकार होतो तर पवार साहेब तुम्ही आम्हाला याच्या पुढच्या वेळेला एका प्रभागामध्ये तीन नगरसेवकांची पध्दत आहे ती चुकीची पध्दत आहे त्यामुळे

नवी मुंबईच्या वतीने असा आम्ही ठराव देतो की, प्रत्येक प्रभागामध्ये एकच नगरसेवक निवडून द्यायचा अशी पध्दत पुन्हा आणा. याच्यामध्ये असे वाद निर्माण झालेले आहेत. जर एखादया प्रभागामध्ये शिवसेना बीजेपीचा, काँग्रेसचा नगरसेवक आहे आणि जेव्हा तो त्यांच्या फन्डातून तो पैसा वापरतो. तुम्ही कॅन्सल करु शकता. तुम्ही कॅन्सल करुन बघा. आम्ही बघू काय करायचे ते. परंतु जेंव्हा एखादी निकडीची बाब आहे. आणि त्या ठिकाणी ते काम झाले पाहिजे आणि तो नगरसेवक त्या पक्षाचा असेल त्याने त्या पक्षाचे काम केल्यानंतर ते दोन नगरसेवकांना हस्तक्षेप करण्याची गरज नाही. उदात्त धोरण विशालता जी सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहान यांनी मांडली त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो. प्रश्न येत नाही. त्या उदात्त धोरणाने त्या नगरसेवकाने काम करावे तो काय सांगेल जर मी समजा राष्ट्रवादीचा नगरसेवक आहे. त्याचे या ठिकाणी जर माझ्या वॉर्डमध्ये इतर आघाडीचा नगरसेवक आहे त्याचे नाव मी असे देणार नाही. त्यांनी करावे जे असेल तो.

**याकुब कुरेशी :-**

त्यामध्ये एक उपसुचना आहे. जर नगरसेवक स्वतःच्या खिशातून खर्च करून करत असेल तर त्याचेच नाव टाकावे. तो नगरसेवक फन्डातून पैसे घेत असेल तर त्यांची नावे टाकावी. तो नगरसेवक फन्डातून पैसे घेत असेल त्याचे त्या कामासाठी लागत असेल तर तिघांची नावे टाकायची आणि स्वखर्चाने करित असेल तर स्वतःचे एकट्याचे नाव टाकावे. ही माझी उपसुचना मांडावी.

**आसिफ शेख :-**

उपसुचना सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांनी मांडलेली आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, हा विषय संपलेला आहे पुढचा विषय घ्या.

**नितीन ठाकूर :-**

तिघांची नावे टाकायची.

**मोहन पाटील :-**

कसे टाकणार? मी देउ का माझ्या बोर्डावर दुसऱ्याचे नांव जर आपण अक्कलहुशारीने काम करतो. तर आपण दुसऱ्याचे नांव टाकायचे का?

**नितीन ठाकूर :-**

विरोधी पक्ष टाकेलच ना.

**याकुब कुरेशी :-**

आज आपण ठरवू तर त्याला टाकावेच लागणार आहे.

**आसिफ शेख :-**

बाकी सर्व कामासाठी एकत्र येतात. या कामासाठी तुम्ही एकत्र का येत नाहीत? आम्ही या संदर्भात प्रशासनाच्या भुमिकेशी सहमत आहोत.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सर्व नगरसेवकांना विनंती की मी परत एकदा सांगतो की हा जो निधी आहे हा कोणाचा वैयक्तिक निधी नाही आहे. हा निधी जनतेचा निधी आहे. आणि त्यांनी नावाबददल वाद करण्याचा प्रश्न नाही आहे. आदर्श निर्माण करा. सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहान यांचे चांगले उदाहरण दिले आणि आम्ही सर्व त्या कार्यक्रमाला होतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहान यांच्या वॉर्डामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्ष होता. तिथे बीजेपी आणि शिवसेना पक्ष नव्हता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मागच्या ठरावाचे काय झाले? दुरुस्ती सुचवता तर दुरुस्ती करुन घ्या.

**दिपक खांबित :-**

ठराव कायम झाला.

**नितीन ठाकूर :-**

कायम कसा झाला?

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी काय सांगितले ज्यांचे निधी वापरले असेल त्याचे नाव टाकायचे.

**नितीन ठाकूर :-**

त्या नगरसेवकाचा निधी वापरण्याकरिता ते नगरसेवक जोडीला आहेत की नाहीत.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आज नियमसे ज्या बाबी हमको प्रशासनने यहॉ पे बताई मै अलग बोलुंगा वो अजग बोलेंगे वो चलेगा नही। जनता का पैसा है। उन्होने बोल दिया। सन्मा. सदस्य आसिफ शेखजी बोले सन्मा सदस्य याकुब कुरेशी बोले सन्मा. सदस्य मोहन पाटील अभी बोल रहे है की ऐसे नियम है। वो नियम से चलो।

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

नगरसेवक निधी हा कायदेशीर निधी नाही. फक्त मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिकामध्ये हा निधी असल्यामुळे आपल्याकडे निर्माण केला आहे.

**मोहन पाटील :-**

मग तो निधी तुम्ही गठित करा. प्रशासनाने आमच्यावर मेहेरबानी करु नये.

**शरद पाटील :-**

तो निधी रद्द करा. नियमात नाही तर देउ नका.

**नितीन ठाकूर :-**

तुम्ही बीजेपीचा रद्द करावा.

**दिनेश नलावडे :-**

निधी आवश्यक आहे. नगरसेवकांचा निधी नामंजूर कशाला पाहिजे?

**आसिफ शेख :-**

माझे तर यावर आणखी म्हणणे आहे की तीन-तीन लाख रुपये दिले. तर खरे म्हणजे पाच-पाच लाख रुपये दयायला पाहिजेत तुम्ही म्हणता तुम्हाला विकास कामे करायची आहेत

**धनराज अग्रवाल :-**

नियमात असेल तर प्रस्ताव कशाला आणला? नियमाप्रमाणे लावून दयायचा. तो इकडे स्थायी समितीमध्ये कशाला आणला?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

एका वॉर्डमध्ये तीन नगरसेवक आहेत. तिघांना महापालिकेतर्फे जो सभासद निधी मिळतो तो तिघांनी मिळून निधी एकाच ठिकाणी वापरतील असे काही नाही आहे. एका सभासदाने वापरले आणि काही वास्तु उभी केली तर त्या सभासदांची इच्छा असली तर त्यांची लावावी. आणि त्यांनी जर त्याच वॉर्ड मध्ये दुसरे काम केले असेल तर लावायचे आणि तिघांनी एकत्र मिळून काम केले असेल तर तिघांनी लावावे.

**धनराज अग्रवाल :-**

मंजुर.

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. २१३ चे वाचन केले.)

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो आपल्याकडे विषय आलेला आहे २१३ सुभाषचंद्र बोस मैदान लग्न समारंभासाठी उपस्थित करण्याबाबत. साहेब आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये एकच असे मैदान आहे जे व्यवस्थित आहे आणि खेळण्यासाठी ग्राउन्ड आहे आणि जर ग्राउन्ड आज अशा पध्दतीने लग्न समारंभासाठी व इतर कार्यक्रमासाठी दयायला लागलो तर हे मैदान न राहता हया मैदानाचे वेगळे चित्र होईल आणि आज आपल्याकडे एकच मैदान असल्यामुळे आज जे स्पोर्टसाठी मैदान उपलब्ध केलेले आहे. याचा खेळखंडोबा होईल आणि यापुढे हे मैदान न राहता इतर कार्यक्रमासाठीच हमेशा उपस्थित करावे लागेल आणि वाद हमेशा आपल्या शहरासाठी पुन्हा पुन्हा महानगरपालिकेत उपस्थित होईल. यासाठी आपल्याकडे हा जो विषय आलेला आहे. लग्न समारंभासाठी हे मैदान न देता फक्त स्पोर्ट ग्राउंड म्हणूनच रहावे. अशी मी सर्व सदस्यांना विनंती करतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय आपण शहराची भौगोलिक रचना बघितली. भाईंदर पूर्व आणि पश्चिम या ठिकाणी ग्रामपंचायत काळापासून हे शहर झपाटयाने वाढले आणि एवढे शहर झपाटयाने वाढल्या कारणाने त्या शहरामध्ये कायदेशीर रित्या नगररचना विभागानुसार जे मार्जीन इमारतीना सुटायला पाहिजे किंवा आपला जो डेव्हलपमेंट प्लान आहे. त्याप्रमाणे ज्या ठिकाणी मैदाने सुटायला पाहिजे, गार्डन सुटायला पाहीजेत. अशा काही जागा आहेत त्या जागा सुटल्या गेल्या नाहीत. त्यामुळे बराचसा ताण इकडल्या नागरिकांवर आला आहे. एखाद्या याला कुठले कार्य करित असेल म्हणजे जी पर्सनल गोष्ट असेल लग्न समारंभ आहे किंवा साखरपुढा आहे किंवा अन्य काही गोष्टी असतील यासाठी प्रत्येक इमारतीसमोर अशा कोणत्या जागा उरलेल्या नाहीत. अशी परिस्थिती या शहरामध्ये आहे जे आहे ते आहे नाकारता येणार नाही या ठिकाणी जो विषय आलेला आहे त्यापुढे आपण जी. आर. चा उल्लेख केलेला आहे. जेव्हा एका बाजूला टिपणी देताना या विषयाला आपण मंजुरी दयावी त्यामध्ये विषय पण दिलेला आहे आपल्याला नगरविकास खात्याचे एक पत्र आहे. तोही राज्यादेश या ठिकाणी दिला आहे त्या राज्यादेशाप्रमाणे या ठिकाणी आपण करु शकत नाही. ही स्थिती तुम्ही असतानाही तुम्ही सांगितले याला शिफारस करा. ही गोष्ट आम्हाला मान्य आहे. शेवटी सार्वजनिक हिताची बाब आहे . सार्वजनिक जी प्रॉपर्टी आहे. तिचा कुठेही विध्वंस होता कामा नये. याची काळजी प्रत्येक नगरसेवक आणि नागरिकांनी घेतली पाहिजे असे या ठिकाणी आलेले आहे. परंतु एका विशिष्ट अडचणीमध्ये जे या ठिकाणी लग्न करायचे आहे त्या लग्न करायचा अर्ज आपल्याला आलेला आहे आणि याच्यापुढे कधीही कोणत्याही नावाचा उल्लेख आपण टिपणी किंवा गोषवाऱ्यामध्ये कृपया आणू नये अशी मी विनंती सभेपुढे करतो आणि जर समजा हे भव्यदिव्य मैदान आहे आणि आम्ही त्या दिवशी मैदानाची प्रत्यक्ष पाहणी केली आम्ही गेलो होतो तर तो जो दुसरा गेट आहे एक गेट आपला पूर्वेचा गेट आहे आणि दुसरा गेट पश्चिमेकडून पाण्याच्या टाकीच्या बाजूला अशी कोणतीही हिरवळ त्या ठिकाणी आपण लावलेली नाही आहे. आणि कोणतेही प्लेन त्या ठिकाणी मैदान नाही आहे. दोन हॉकीची मैदाने शुटिंग बॉल हॉकीची मैदाने आपण ठेवली आहे. त्या हॉकीचे मैदान आपण एका बाजूला केले आणि यासाठी बाकीच्या बाजूला आपण दिले व एका बाजूला टाकीचे बांधकाम सुरू आहे. अशा एका विशिष्ट बाजूला आपण दिले जर लग्न समारंभासाठी आपण दिले. लग्न समारंभासाठी दिल्यानंतर त्याची प्रथा पडू नये याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. म्हणजे याच्यापुढे एखाद्या लग्नाला द्यायचे आहे म्हणून तो अर्ज आपण त्या ठिकाणी आणलेला आहे. नावानिशी आपण अर्ज आणता. प्रत्येक सदस्य विचार करतो. हे लग्न कोणाचे आहे काय आहे, कोणत्या पक्षाचा, कोणत्या ह्याचा माणूस आहे, कोणाचा नातेवाईक, कोणाचा काय आहे असा त्या ठिकाणी प्रश्न निर्माण होतो. म्हणून कुठल्याही गोषवाऱ्यामध्ये ते येता कामा नये. जर आपण त्या साईडला जर मैदान दिले त्या गेटवर जिथे जास्त मोठा क्रिकेटचा गेम असतो. क्रिकेटच्या मैदानाला कुठे बाधा येणार नाही आहे आणि त्या मैदानामध्ये अटी शर्ती आपण दिल्या आहेत आणि त्या ठिकाणी बांबू घातले आहेत त्या ठिकाणी बांबू बरोबर बंद केले पाहिजे. कचरा फेकला नाही पाहिजे साफसफाई करुन विशिष्ट डिपॉझिट आपण घेतले तर त्या बाजूला कोणत्याही मैदानाला बाधा येउ शकत नाही. असे चित्र त्या ठिकाणी आहे आणि ते प्रत्यक्ष अधिकारी किंवा सभापती महोदय या नात्याने आपण प्रत्यक्ष पाहणी करून आपल्याला पाहणीत असे आढळले की, ते मैदान कुठे बाधीत होत नसेल तर त्या मैदानावर आपण हे करायला हरकत नाही आणि ते बाधीत होत असेल तर आपण देउ नये आणि बाधीत होत नसेल तर आपण विचार करावा असे या ठिकाणी मी मांडत आहे आणि जर एक या लग्नाला दिल्यानंतर याची प्रथा पडत असेल ती प्रथा पडता कामा नये. कारण हे शहराचे भूषण आहे आणि त्या ठिकाणी शिलोत्र्यांनी आपले हे मैदान आपला कोणताही मोबदला अजूनपर्यंत न देता कोणतीही वाटाघाटी न करता शिलोत्र्यांनी ते मैदान आपल्या ताब्यात दिलेले आहे आणि ते असे देत असताना तेही भानुदास भोईर त्या ठिकाणी शिलोत्री आहेत. त्यांचे मामा काका मामा भाउ हे त्या ठिकाणी शिलोत्री आहेत आणि त्यांनी कोणताही मोबदला घेतला नाही आणि कोणताही मोबदला शिलोत्र्यांना दिला नाही. फक्त या ठिकाणी सन्मा. आदरणीय नेते गिल्बर्ट जॉन मेन्डोसा यांच्या शब्दाखातर त्यांना एकत्र बसवून त्याना सांगितले तुमचा पुढे विचार केला जाईल. असे सांगितल्यानंतर त्यांच्या शब्दाखातर त्या मैदानामध्ये आपल्याला भरणी करता आली. भराव करता आला. ते मैदान त्या ठिकाणी निर्माण केले. यांच्यामध्ये गिल्बर्ट जॉन मेंडोसा साहेंब यांनी शिलोत्र्यांना शब्द दिला आणि शिलोत्र्यांनी कोणताही पैसा मोबदला न मागता ते मैदान त्या ठिकाणी दिले आणि

आपण भरावही केला. ते असलेले शिलोत्री त्यांचाही विचार करावा असे मी या ठिकाणी आपल्याला प्रस्ताव आणू इच्छितो. आपण त्याच्यावर सार्वजनिक विचार करावा आणि या शहरामध्ये प्रथा पडता कामा नये. कारण आपल्याकडे कोणतेही मैदान या शहरामध्ये नाही आहे. आणि असे हे भव्यदिव्य मिरा भाईंदरचे भूषण ठरेल आणि याच्यामध्ये या मैदानामध्ये स्टेडियम व्हावे अशी इच्छा या इथे बसलेल्या सर्व सदस्यांची, प्रत्येक नागरिकांची, सर्वांची आहे की, या ठिकाणी ते करता आले पाहिजे आणि कोणतेही मैदान हे लग्नासाठी देउ नये याच्यापुढे आणि लावलेल्या गवताला अडचण येत नसेल तर द्यावे आणि ती थोडीफार लेव्हल त्यांनी करावी. असा मी या ठिकाणी प्रस्ताव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. २१३ वर मी बोलू इच्छितो. याच्यामध्ये जे भानुदास भालचंद्र भोईर असे जे प्रशासनाने नाव टाकले आहे विषय जर योग्य असेल तर आणि त्याला जर प्रशासन नियमानुसार परमिशन दयायची असेल प्रशासन देउ शकते. पण कोणाचेही नाव टाकले त्याला काही फरक पडत नाही. म्हणजे उदया माझे जरी नाव टाकले आणि नियमात नसेल तर मी ते नियमानुसार प्रशासनाकडून घेणार. यात काही वाद नाही परंतु या उपर जाउन मी सांगतो की आता आपल्या शाळा क्र. १६, १७, १८ मध्ये सत्संगाकरिता हे सर्व फॅड वाढत चालले आहे. कोणतरी बाबा उठल्या-सुटल्या उठतो आणि जिकडे तिकडे सत्संग चालू करतो म्हणजे काय करतात. ज्याला जायचे त्याने जावे आम्हाला काही देणे-घेणे नाही आहे. परंतु आपल्या शाळा क्र. १६, १७, १८ मध्ये हा सत्संग झाल्यानंतर त्या पटांगणामध्ये, त्या वरांडयामध्ये संडास लघवी करतात. सफाई बिल्कुल नसते. आपल्या याच ग्राउंडमध्ये संत निरंकारी मंडळ आहे. त्या बाबांचा आता एक कार्यक्रम झाला आहे. आपण बांधकाम विभागातर्फे लाखो रुपयांचा खर्च त्या मैदानाच्या डेव्हलपमेंटकरिता आतापर्यंत केलेला आहे. हिरवळ लावली, गवत लावले, माती टाकली, सगळी त्याची लेव्हल केली. सभापती साहेब आपल्या लक्षात आले असेल तर आपल्याकडे ज्या ज्या काही इतर कामाकरिता सुध्दा मंडळांना क्रिडांगण दिलेले आहे. संपूर्णपणे त्या क्रिडांगणामध्ये.

**मा. सभापती :-**

थोडक्यात म्हात्रे साहेब, द्यायचे की नाही यावर बोला ना. याच्यावर चर्चा कशाला करता?

**मिलन म्हात्रे :-**

या व्यक्तीचा काल रात्री मला फोन आला होता की, तुम्ही आम्हाला सपोर्ट करा. तुम्हाला स्पष्ट सांगतो.

**मा. सभापती :-**

द्यायचे तर सर्वांना द्यायचे असा नियम लागतो. नाही द्यायचे तर कोणालाच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

यामध्ये अनेक वेळा त्याचे नुकसान हे प्रचंड प्रमाणात महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. आता ह्याच्यामध्ये जो जी.आर. दिला हा काल सामान्य प्रशासनाकडून काढला. जी.आर.चा जो याच्यात उल्लेख आहे. निर्देश उक्त नियमानुसार कलम ३७ अ नुसार क्रिडांगणाच्या धार्मिक, राष्ट्रीय सभांना वापर अनुज्ञेय करताना खालील अटीशर्तीचे पालन करण्यात यावे. एक क्रिडांगणाचा वाणिज्य वापरासाठी उपयोग करता येणार नाही. क्रिडांगणाचा वाणिज्य वापरासाठी उपयोग अनुज्ञेय राहणार नाही. शासनाचे प्रधान सचिव यांनी दिलेला आहे. त्याचे उल्लंघन आपण करता कामा नये. स्टँडिंग कमिटीला हे कायदेशीर आहे की, आपली अशी घटनात्मक कमिटी आहे. या शासनाच्या जी.आर. चे उल्लंघन होणार नाही. म्हणून आम्ही याला परमिशन देत नाही. असे माझे मत नोंदवून घ्यावे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब सुभाषचंद्र बोस मैदान मिरा भाईंदर क्षेत्रात शाळेकरिता कारण हे मैदान म्हणजे खरे तर किंवा क्रिडा स्पर्धासाठी आहे. तर माझे असे मत आहे की आपले अख्खे क्षेत्र फक्त हे एकच मैदान आहे याच्यामध्ये आपण खेळाचा कार्यक्रम आपण राबवू शकतो. नगरपालिकेची शाळा असू दे किंवा प्रायव्हेट शाळा असू दे. तर माझी अशी सुचना आहे की याला सांस्कृतीक कार्यक्रम कुठल्या धर्माचा कार्यक्रम कुठे स्टेज लावणे फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी आपण तिकडे करायचे आहेत. ते आपण महानगरपालिकेच्या हयाच्यामध्ये आपण करतो. तर कुठलाही स्टेज बांधण्याची परवानगी हया मैदानावर दयायची नाही. आणि कुठे एकदा लग्न समारंभ एका माणसाने कुठल्याही एका शहरासाठी

काम केले असेल आणि मदत केली असेल त्याचा असा अर्थ नाही की त्याला आपण हे करायचे ते करायचे असे कुठेही उदभवत नाही. पण मला असे वाटते की हे सुभाषचंद्र बोस मैदान कुठलाही लग्न समारंभ धर्माचा कार्यक्रम की सांस्कृतीक कार्यक्रम कुठे स्टेज बांधून तिथे आपण बांबू, लाकडे मारता. तशासाठी दयायचा नाही असा मी ठराव मांडत आहे.

**दिनेश नलावडे :-**

या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय आपल्याकडे जितक्या शाळा असतील त्या शाळेमध्ये सर्वामध्ये मैदान आहे. मग हा विषय डॉ. सुभाषचंद्र बोससाठी आणलेला आहे का? सार्वजनिक विषय आणलेला आहे. ठरावात ठरवले नाही द्यायचा असे.

**रिटा शाह :-**

शाळेची म्हणजे खेळाची फक्त स्पर्धा घ्यायची.

**मिलन म्हात्रे :-**

यांचा बोलण्याचा अर्थ असा आहे की जी आपली सगळी जी शाळेजवळची मैदाने आहेत. त्याचा पण यात समावेश करायचा आहे का? सगळयांना एकच नियम लागू होईल का?

**याकुब कुरेशी :-**

आता तुम्ही फक्त एकच मैदानाचा विषय आणला आहे आणि सगळे कसे त्याच्यामध्ये मिक्स करता. माझे एवढेच म्हणणे आहे सुभाषचंद्र मिक्स करता. माझे एवढेच म्हणणे आहे सुभाषचंद्र बोस स्टेडिअमसाठी आता हा विषय आलेला आहे. तुम्ही तो सगळया मैदानाचा विषय लवकर घेउन या त्याच्या आम्ही ठराव करुच.

**नितीन ठाकूर :-**

साहेब तुमचे लेटर फक्त सुभाषचंद्र बोस मैदानाकरिताच आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. मग आपण आपण याच्यावर आपण चर्चा करु.

**याकुब कुरेशी :-**

विषय पण फक्त तोच आहे.

**दिपक खांबित :-**

नवघर मैदानासाठीपण पत्र आले आहे साहेब.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही ते सगळे आणा. सगळा उल्लेख करा. तुम्हाला काही त्रास आहे का? तुम्ही इकडे काय उल्लेख केलेला आहे. एकच मैदानाचा उल्लेख केलेला आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला एकच निर्णय घ्यायचा आहे . लवकर दयायचा नाही. म्हणजे तिकडे पण तोच विषय आला आहे. लग्नासाठी परत मागणी केली आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, तो विषय आणा.

**मा. सभापती :-**

कसा आपण देउ शकतो? आपल्या जी.आर.मध्ये दिलेले आहे. देउ शकत नाही म्हणून

**नितीन ठाकूर :-**

पण तुम्ही एकच विषय आणला आहे साहेब.

**मा. सभापती :-**

आता त्याना कोणाचे लग्नाचे लेटर आले असेल.

**शरद पाटील :-**

त्यांचे लेटर महापौर चषकासाठी आहे.

**याकुब कुरेशी :-**

मैदान एकच आलेले आहे. नावाचा वगैरे उल्लेख तुम्ही एकच मैदानाचा केलेला आहे. तीनच मैदान आपल्याकडे आहे. मग तिघांची नावे टाकायला तुम्हाला हरकत होती का? म्हणून सांगतो तो विषय तुम्ही नंतर आणा. आता सध्या एकच विषय आलेला आहे.

**अनंत पाटीलः-**

अध्यक्ष महोदय सुभाषचंद्र बोस मैदान आहे. लग्नाच्या निमित्ताने त्यामध्ये भानुदास भोईर यांनी जी मागणी केलेली आहे. तिकडचे स्थानिक नागरिक आहेत. जागेअभावी ते तिकडे ते लग्न उदघाटन करु शकत नाही. ती जागेची अडचण आपण लक्षात घेऊन, अटीशर्तीला अधीन राहून किंवा योग्य ते भुभाडे ठरवल्यानंतर द्यायला हरकत नाही.

**मा. सभापतीः-**

पण आपल्या जी.आर.मध्ये देउ शकत नाही असे आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब जी.आर.मध्ये वानखेडे स्टेडिअम लग्नाला दिलेले मला वाटते तुमच्या लक्षात असेल

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

ते खाजगी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब या शहरामध्ये भरपूर मैदाने आहेत आमच्याकडे अग्रवालचे ग्राउन्ड आहे, कॅथॉलिक जिमखाना या ठिकाणी आहे.

**मा. सभापती :-**

अशी प्रायव्हेट कितीतरी मैदाने आहेत. त्यांनी ते मागवावे आपल्या जी.आर. मध्ये देता येत नाही.

**अनंत पाटीलः-**

आपल्या ताब्यात असतील तर तुम्हाला दयायला हरकत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापतीसाहेब इथे सुभाषचंद्र बोस मैदानाचा जो विषय आहे विषयाशी अनुषंगुन जी.आर. चा उल्लेख केलेला आहे. मागे जेव्हा ३१ डिसेंबरला सुभाषचंद्र बोस मैदान मध्यरात्रीसाठी ज्यावेळी दिलेले त्यावेळी त्याचा विचार केलेला का? एखादया संघटनेला ज्यावेळेला तुम्ही दिले त्यावेळेला त्या मैदानाचा विचार केलेला का? त्या मैदानाची किती नासधूस होणार आहे किती त्याचा दुरुपयोग होणार आहे. आता एखादया व्यक्तीने जर तुमच्याकडे मागणी केली तुम्ही जी.आर.चा उल्लेख दाखविता. त्या व्यक्तीला मागे त्याच्या लग्नकार्याच्या वेळेला किती नागरिकांना त्रास झाला त्याची कल्पना सन्मा. सदस्य अनंत पाटील यांना असेल जवळजवळ तास दिड तास त्या ठिकाणी फुल ट्रॅफिक जाम झाले होते आणि त्या ट्रफिकमध्ये जर एखादा नागरिक अडकला असेल तर त्या सन्मा. माणसाने जर तुमच्याकडे मागणी केली त्याना काही अटी शर्ती ठरवा. आणि जसे सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलले

**मा. सभापती :-**

अटीशर्तीचा प्रश्न कुठे येतो? आपण एकाला दिले तसे सर्वांना दयायला लागणार हा आपला नियम धरुन चाला.

**हॅरल बोर्जीस :-**

पुढे जर तुम्हाला असे वाटले त्या मैदानाचा दुरुपयोग चालला आहे.

**मा. सभापती :-**

माहिती पडले आहे की दुरुपयोग झालेला आहे

**दिनेश नलावडे :-**

सभापतीसाहेब आपण हा विषय मंजुर केलेला आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांना माहिती आहे पाठीमागे काय झाले? ती गोष्ट वेगळी होती आता मंजुर केलेले आहे. यापुढे असे काही होणार नाही. पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे की आपल्याकडे त्यांनी अर्ज दिलेला आहे पाहणी करा मैदानाची नासधुस होत नसेल आणि तिकडचा कॉर्नरचा भाग त्यांना आपण दिला तर त्याना हरकत नाही.

**याकुब कुरेशी :-**

माझे सभागृहामध्ये असे मत मांडू इच्छितो की निदान कोणाला नागरिकांना दिले तरी आजी व माजी नगरसेवक हे लक्षात घेउन त्याना तरी हे मैदान दयावे अशी माझी विनंती आहे.

**रिटा शाह :-**

साहेब मी ठराव मांडलेला आहे. नगरसेवक असू दे, आमदार असू दे, काहीही असू दे. नियम नियम असतो. नियम सर्वाना मानावा लागेल. भानुदास भोईरला देत नसेल तर सर्वांसाठी ओपन ठेवा. आम्ही ठराव मांडला आहे दयायचे नाही म्हणून. दयायचे असेल तर मग सर्वांना दया.

**दिनेश नलावडे :-**

आजी नगरसेवक नाही. माजी नगरसेवक नाही. लग्नासाठी आणि इतर कार्यक्रमासाठी धार्मिक कार्यक्रमासाठी मैदान उपलब्ध होउ नये असा आपण सर्वांनी ठराव मंजुर केलेला आहे. विषय क्र. २१४ ला सुरुवात करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सत्संगाला येणारे मलमुत्र करतात. हे म्हणणे बरोबर दिसणार नाही. कारण सत्संगाला येणारे लोक हे सरळ मनाने येतात सरळ मनाने जातात.

**मोहन पाटील :-**

हा विषय कायदयामध्ये बसत नाही आहे. पाहणी करा. पाहणी करायला काय होते.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय माझी अशी सुचना आहे की, याच्यापुढे कुठचेही सार्वजनिक काम दयायचे असेल तर तो जनरल विषय म्हणून आणावा. कुणाच्या व्यक्तीच्या नावाने हा विषय आणू नये. अशी माझी वैयक्तिक सुचना आहे. या सुचनेची नोंद झाली पाहिजे.

**नितीन ठाकूर :-**

नावामुळे विरोध झालेला नाही.

**शरद पाटील :-**

नावापुढे विरोधाचा प्रश्न नाही. नियम ते नसु दे पण जेव्हा तुम्ही नियम ते देता. त्याच्यानंतर विषय घेउन येता.

**याकुब कुरेशी :-**

हे नियम आजकाल आले आहेत का? याच्यापूर्वी पण होते.

**शरद पाटील :-**

म्हणून मी सांगतो हा विषय जनरल आणला असता तर याच्यावर चर्चा झाली नसती की याला विरोध करायला कोणाला त्रास झाला नसता. त्याच्यामुळे असे विषय आणताना जनरल आणा. कोणाच्या नावाने आणू नये.

**आसिफ शेख :-**

३१ डिसेंबरच्या रात्री मैदानाचा वापर केला तिथे नासधूस केलेली चालते पण आता अर्ज आले तर त्याचा निकाल लावून टाका अर्ज आपल्याकडे आलेला आहे. विषयपटलावर विषय आहे पाहणी करा. प्रशासनाने पाहणी करा.

**प्रकरण क्र. २१३ :-**

लग्न समारंभा करिता सुभाषचंद्र बोस मैदान भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे सुभाषचंद्र बोस हे एकमेव मैदान असून सदर मैदान महानगरपालिकेमार्फत अनेक संस्था / शाळा यांना खेळाच्या कार्यक्रमाकरीता भाड्याने देण्यांत येतो. संदर्भिय शासन निर्देशानुसार मैदानाचा राष्ट्रीय व धार्मीक कारणासाठी वापर अनुज्ञेय अटीशर्ती घातलेल्या आहेत.

संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये श्री. भानुदास भालचंद्र भोईर यांनी सदर मैदान लग्न कार्यानिमित्त दि. १६ फेब्रुवारी २००४ रोजी वापरण्यांस परवानगी मागितलेली आहे.

सोबत शासन परिपत्रक व मैदान मागणीचा आलेला अर्ज जोडलेला आहे. सदर मैदान लग्न कार्याकरीता भाड्याने देणेबाबतचा उल्लेख नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुभाषचंद्र बोस मैदान प्रमुख मैदान असून सदर मैदाने शालेय क्रिडास्पर्धाकरीताच भाड्याने देण्यांत यावीत. लग्न समारंभ, सांस्कृतीक कार्यक्रम, शालेय वार्षिक महोत्सव, इतर धर्मीय उत्सव, बिरहा, आनंदमेळा इ. करीता भाड्याने देण्यांत येऊ नये असे ही सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण क्र.२१४ चे वाचन केले)

**मोहन पाटील :-**

आपण आता अग्रक्रम ठरवू पण त्याच्यापूर्वी पाहणी करा.

**दिपक खांबित :-**

प्रशासन सांगते त्या जागेवर परवानगी देउ शकत नाही.

**रिटा शाह** :-

साहेब माझा त्याला संपूर्णपणे विरोध आहे.

**मा. सभापती :-**

याच्यापुढे कुठल्या अधिकाऱ्यांनी कुठल्या ग्राउंडवर परवानगी दिली त्या वर आपण सस्पेंडचा निर्णय देउ नवघरला म्हणा भाईंदर वेस्टला म्हणा त्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल.

**आसिफ शेख :-**

येथून पुढे देउ नका. पण आता आलेल्या अर्जावर देउन टाका. सभापतीसाहेब तुमच्या मताशी आम्ही सहमत आहेत.

**मा. सभापती :-**

मी देउ नका म्हणालो नाही दिल्यावर त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**अनंत पाटील** :-

नवघरमध्ये आपण अशा तऱ्हेने एकदा परवानगी नाकारली होती मैदानावार का मालवणी जत्रोत्सावासाठीसुध्दा झाली.

**याकुब कुरेशी :-**

ती २२ दिवसाची परवानगी मागितलेली पण त्याला आपण पाच दिवसाची मालवणी जत्रोत्सवासाठी परवानगी दिलेली आहे त्याच्यामध्ये एवढाच फरक आहे की, आपण पैसे घेतलेले नाहीत.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आमची अशी मागणी आहे की, आपण पाहणी करा आणि पाहणी करुन निर्णय घ्या तुम्ही रुलिंग दया. पाहणी करुन निर्णय घ्या. तुम्ही सभापती आहात, त्यांचे आदेश तुम्ही कसे पाळता.

**मा. सभापती :-**

प्रशासन देऊ शकत नाही.

**दिनेश नलावडे :-**

आपला एकदा निर्णय झालेला आहे आणि परत परत आपले सन्मा. सदस्य आसिफ शेख पाहणी करा. परत निर्णय बदली करा. ठराव एकदा मंजुर झाला आहे तर आपण काय करु शकतो ठराव आपण दिलेला आहे ठराव परत बदली करायचा का? सहया झालेल्या आहेत. त्यावेळेस आपण आपल्या अधिकाऱ्यांनी प्रशासनाने त्यांना पावती दिलेली होती पैसे भरले होते

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मंजुर झाल्यानंतर आपल्याला डिसीजन घेता येणार नाही.

**मा. सभापती :-**

मैदान देता येणार नाही. हा निर्णय घेतलेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

गोषवारा दिलेला आहे. फार मोठा विषय आहे. पुढे घेतला तर बरे होईल.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१४ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

आपल्याकडे वेळ नाही इलेक्शन आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

यामध्ये जो १ नंबर आहे. वीर चीमाजी आप्पा स्मारक सर्वे नंबर २४ आणि याच्यामध्ये कुठला शेरा दिलेला नाही. माझ्यामते प्रशासनाकडून ती चुक झालेली आहे. वीर चीमाजी आप्पा स्मारकावर मातीचा भराव इत्यादी प्रकारे खर्च झालेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब ही आरक्षणे कुठे आहेत? सध्याचे काय पोझिशन आहे याच्यावर अतिक्रमणे आहेत का? हे आरक्षण कशासाठी आहे? याची सर्व लिस्ट आम्हाला द्या. कारण आम्हाला संध्याकाळी मिळाले. आम्हाला काहीच माहिती नाही कुठले आरक्षण कुठे आहे कशासाठी आहे?

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब ये बात आप मत किजीए। मै क्या करु? आप ॲक्शन ले सकते है? और सबसे पहले मिटिंग मे आपने कहा है की मै इसके उपर ॲक्शन लुँगा।

**मा. सभापती :-**

इसके लिए मै बोला कल दिया।

**याकुब कुरेशी :-**

फिर भी इन लोगो को आपका डर नही।

**मा. सभापती :-**

इसके लिए वो लोग बोलते है अगले हप्ते मिलेंगे। मेरे आनेसे तीन महिने बीत गए। आज तक अगला हप्ता नही आ रहा है। इसके लिए ये जो अभी सबजेक्ट दिया है। उसके उपर चर्चा करो। पुरा दिन जायेगा। कुछ प्रॉब्लेम नही। उनको पुछो क्या करना है? क्या नही आजतक क्या किया?

**याकुब कुरेशी :-**

इसके बारेमे हम लोगो को कुछ मालुम नही। हम क्या चर्चा करेंगे। थोडीसी स्टडी होनी चाहिए। एसके लिए टाइम लो। अगले वीक मे रखो।

**मोहन पाटील :-**

तसे असेल तर विशेष सभा घ्या. तीन दिवसानी तरी चालेल.

**मा. सभापती :-**

लोकसभेचे इलेक्शन जवळ आले व आचारसंहिता लागू होणार आहे.

**चंद्रकांत वैती :-**

तसे नाही सर्व सदस्यांचे आलेल्या सुचना ह्यामध्ये अजून आपल्या अभ्यासपूर्ण माहितीतून अजून काही आरक्षणे यामध्ये समाविष्ट करता येतील. तर तशा संदर्भात दयावे आणि आज आपण आरक्षण ताब्यात घेतल्यानंतर त्याचा विकास करायला आपल्याला एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लागणार आहे आपण फक्त प्राधान्य ठरवतो आहे.आज आपण ठराव घेतल्यानंतर ताबडतोब हया आरक्षणाच्या विकासाला सुरुवात करीत नाही. परंतु आपली जी आरक्षणे आहेत त्याच्यामध्ये काही सरकारी मेंबर आहेत त्याच्यावर अतिक्रमणे या आपल्या आरक्षणाला आपण केले पाहिजे आपण ती ताब्यात घेतले पाहिजे त्याच्या विकासाच्या ॲटलिस्ट मुददयांना सुरुवात झाली पाहिजे एवढयाच उददीष्टाने हा विषय आणलेला आहे. याच्यामध्ये अजून काही गोष्टी समाविष्ट होणे गरजेचे आहे. जसे मिरा भाईंदर महापालिकेचा सेन्ट्रल हॉल एक प्वाईंट आहे टाउन हॉल शिवार गार्डनच्या बाजुला रिझर्वेशन आहे. त्याच्यावर अतिक्रमण होते तर याही गोष्टी यामध्ये समाविष्ट व्हायला पाहिजे अशी मागणी असेल की आम्हाला खरोखरच अभ्यास करायचा आहे पुढच्या गुरुवारी हा विषय आणला तरीही हरकत नाही दरम्यानच्या काळात आपल्याकडे टाउन प्लॅनिंगची पुस्तके आहेत मॅप आहेत त्यातून काही रिझर्व्हेशनचा

अभ्यास करावा. ती रिझर्व्हेशन समाविष्ट करा. परंतु आपण सर्व रिझर्वेशन सरसकट घ्यायचा प्रयत्न केला तर आपण त्यामध्ये यशस्वी होणार नाही. कारण आपल्याला टप्प्याटप्प्याने विकसीत करायची आहेत आणि अग्रक्रम यांना दयायचा ठरलेला आहे. तसे मिरा भाईंदरमध्ये महानगरपालिकेमध्ये आपले स्वतःचे मार्केट नाहीत. आताच नुकतीच हायकोर्टाची ऑर्डर आलेली आहे की ना फेरीवाला क्षेत्र, हॉकर्स झोन आपल्याला निर्माण करायचे आहे. तर अशी जी प्रॉयोरिटी आहेत मार्केट आहेत ती देखील ताब्यात घ्यायची आहेत यामध्ये आपण प्रयोजन केलेले आहे. तर हा विषय आपण ताब्यात घेतल्याबरोबर लगेच ॲक्टीव्हेट होणे अशातला भाग नाही. तर किमानपक्षी त्या विषयाला आपण सुरुवात केली. ही तुमची आमची सर्वांची तुमच्या आमच्यासाठी चांगली गोष्ट असेल कारण आपण या शहराला काय देणार आहोत? आपण पुढच्या गुरूवारी विषय घेतला तर हरकत नाही. पण आपल्याकडून नवीन सुचना दयाव्यात हा विषय शहराच्या हितामध्ये विकासामध्ये आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जेव्हा हा विषय तुम्ही घ्याल. तेव्हा या आरक्षणावर किंवा अतिक्रमणे वगैरे आहेत याचीसुद्धा एका बाजुला लिस्ट दया. आपण एकदा अग्रक्रम देणार.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी लिस्ट दिलेली आहे. त्यामध्ये वीर चिमाजी आप्पा स्मारक बांधकाम विभाग सांगेल किती खर्च केला तो ? असे असताना हे विचाराधीन किंवा विकसित वगैरे काहीही दिलेले नाही आहे. या लिस्टमध्ये पुढे या सगळया ज्या डॅशेस दिलेल्या आहेत पेणकरपाडा प्राथमिक शाळा पेणकरपाडा वाचनालय, पेणकरपाडा डिस्पेन्सरी, पेणकरपाडा बगिच्यामध्ये मी स्वतः जाउन आलो आहे. याच्यामध्ये आता हे एवढे सुंदर बनवतात. याचे सगळे काम चालू आहे आणि सरळ डायरेक्ट फिलींग द ब्लॅक्स.

**दिपक खांबित :-**

साहेब, खर्चाचा काय संबंध?

**मिलन म्हात्रे :-**

कशाला विचाराधीन किंवा विकसित करण्याचे काम चालू आहे.

**दिपक खांबित :-**

तुम्हाला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माहिती आहे असे नसते. तुमचा शेरा काय आहे तो दया.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

विषय दुसरीकडे चालला आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब त्यांचे म्हणणे बरोबर आहे की कोणती जागा ताब्यात घ्यायची आहे आणि जागा ताब्यात घ्यायची नाही हा आपला विषय आहे पण तो विषय ठरविताना आपल्याला आपल्या प्राधान्याने ठिकाणी किती खर्च येईल आता समजा आपण या ठिकाणी रिझर्वेशन दिले. या ठिकाणी एक दिले विकास योजनेतील रस्त्याची यादी आहे तर तुम्ही रस्ते ताब्यात घ्या कामाला आपल्या सुरुवात होउन जाइल.

**मिलन म्हात्रे :-**

मी विरोध करत नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, जो ठराव आला विषयपत्रिका जी लिस्ट दिली ती परिपूर्ण दया आणि ठराव मंजुर करुन घ्या माझे ते म्हणणे नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दोन मिनीटे, सांगतो. मग सगळे क्लियर होईल.

**आसिफ शेख :-**

मिरा रोडमध्ये ज्याप्रमाणे आपण दफनभूमि स्मशानभूमी बरेल ग्राउन्ड बनविले आहे, जॉगिंग पार्क बनविले आहे त्याच धर्तीवर आपल्या भाईंदर पश्चिमेला आपण स्टेशनच्या समोर बनविणार होतो. त्या सॉल्टच्या जागेमध्ये आपण स्वत: येउन पाहणी करुन गेलो. आहे नंतर पुढे काय झालेच नाही मग त्या लोकांची सोय कधी करणार? आणि वाद उत्पन्न होतो म्हणजे एखादे मयत झाले तर कुठे घेउन जाणार? ते इकडे घेउन येणार का? तो विषय यामध्ये आलाच नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

हे जे दोन मुद्दे आहेत ते जागा ताब्यात असलेले आहेत. हे तुमच्या मंजुरीने काम चालू आहेत त्याचे एस्टीमेट मंजुरी आता ठेवण्याची काही आवश्यकता नाही आहे मग तुम्ही काय बोलायचे ते बोला आता जे दुसरा विषय आहे तो प्रायोरिटी ठरविण्याचा आहे ते प्रायॉरिटी ठरवण्यामध्ये मागच्या वेळेला आपण गेल्या वर्षभर स्थायी समितीमध्ये आपण जी चर्चा केली त्यामधील सर्वात महत्वाची चर्चा ज्या लोकांना अत्यावश्यक सेवा देणे गरजेचे आहे उदाहरणार्थ मार्केट, दफनभूमी, स्मशानभूमी आणि स्लॉटर हाऊस, ओ.पी.डी.चे दवाखाना यामध्ये या टॉप प्रायॉरिटीवर तुम्ही इथे निर्णय घेतल्यानंतर थोडे जे तुमच्यापुढे जे बजेट दहा पंधरा दिवस चालणार आहे. ह्याचा निर्णय दरवेळेला आपण बजेटमध्ये प्रोव्हिजन करतो. पण जागा ताब्यात नसल्यामुळे परत वर्गीकरण करत बसतो. त्यामुळे काम दाखवायला नागरिकांना जागा नाही काम काय झाले हे तुम्ही दाखवू शकत नाही फक्त बजेट प्रोव्हीजन करतो. त्यामुळे मागच्या वर्षभरामध्ये जी चर्चा होउन ठरविले आणि तुम्ही चर्चेमध्ये म्हटले पण हे सर्वात अत्यावश्यक सेवा आहेत.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे. आता ही शिफारस होईल हे धोरण आहे ही शिफारस होईल की निर्णय होईल

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

तुम्ही टॉप प्रॅयॉरिटी ठरविल्यानंतर हा विषय महासभेत येईल. धोरण येईल म्हणजे प्रायोरिटी येईल म्हणजे तुमच्या फर्स्ट प्रायॉरिटीमध्ये जर ते विषय आले तर ते महासभेपुढे जाईल महासभेने भुसंपादनाचा निर्णय घेतल्यानंतर कलेक्टरकडे जाईल परंतु तुम्ही जोपर्यत हा निर्णय निदान अत्यावश्यकतेनुसार तरी.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब आता हा तुम्ही प्रस्ताव दिलेला आहे. याला तुम्ही जागा आरक्षित करणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आरक्षित झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आरक्षण झाले पण ताब्यात घेतले का? हा जो ठराव आहे या ठरावामध्ये अनेक महत्वाची आरक्षणे अजूनही यामध्ये घेतलेली नाहीत. माझ्या वॉर्डमध्ये सर्वे नं ७५३ मध्ये जी तुमची आरक्षणे आहेत. ती सर्व याच्यामध्ये समाविष्ट करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण रिक्षा स्टँड, हॉकर्स झोन हे सगळे याच्यामध्ये मोठा तीस मीटरचा रस्ता हे सगळे आहे आणि शहरात स्टेशनच्या बाजूला पश्चिमेला लागून आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

सर्वात महत्वाचे म्हणजे सगळी आरक्षणे या लिस्टमध्ये आहेत डेव्हलपमेन्ट प्लॅनमधील एकही आरक्षण यामध्ये घ्यायचे शिल्लक राहिलेले नाही.

**मोहन पाटील :-**

सगळे रस्ते आलेत ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

रस्तेदेखील सगळे आलेले आहेत फक्त एवढेच की टॉप प्रायॉरिटी ठरविण्यासाठी तुम्ही अभ्यास करुन निर्णय घ्या परंतु सुरुवातीला प्रॅयॉरिटी बजेट प्रोव्हीजन करण्यासाठी अत्यावश्यक सेवेचे जे आहेत म्हणजे तुम्ही वेळोवेळी स्थायी समितीला चर्चा केलेली आहे. मार्केट, हॉस्पिटल, ओ.पी.डी., स्लॉटर हाउस, दफनभूमी आणि स्मशानभूमी याचातरी निर्णय टॉप प्रॅयॉरिटी ठरविला तर महासभेपुढे एस्टिमेटचा विषय येइल. तर ते भूसंपादन करायला कालावधी जाईल. म्हणजे प्रत्येक वेळेला आपण बजेट प्रोव्हिजन करुन कामच काही होत नाहीत. म्हणून आता जर आपण निर्णय घेतला तर पुढच्या वर्षी काम करु शकाल याचा सर्वानी विचार करावा

**आसिफ शेख :-**

पश्चिमेकडील दफनभूमिचे काही आले नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

आरक्षण नाही आहे तो सरकारी जागा मागणीचा विषय आहे.

**आसिफ शेख :-**

मग ते पण यायला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

तिथे आरक्षण टाकले नाही.

**आसिफ शेख :-**

मग आरक्षण टाकून घ्यायला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

आरक्षण टाकले नसेल तरीसुध्दा जागा मागणी दफनभूमीसाठी मागितली तरी मिळते. ते तुम्ही पाठपुरावा करुन मागून घ्यायचा.

**आसिफ शेख :-**

तुम्ही करायचे म्हणजे आपली जबाबदारी नाही. तुम्ही पाठपुरावा करा असे तुम्ही उत्तर देता. आपली जबाबदारी आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो):-**

आमची जबाबदारी आहे. आरक्षण असेल तर कम्पलशन जागा मोफत वर्ग होते आरक्षण नसेल तर कलेक्टरकडे जाउन ते जागा ताब्यात देताना व्हॅल्युएशन करतात. व्हॅल्युएशन करुन त्याची किंमत मागतात आरक्षण नसलेली जागा आपण त्यावेळेला सुरुवातीला घन कचरा व्यवस्थापनाचे तिथे करणार होतो. नंतर आपला निर्णय बदलला आणि ती जागा यासाठी करायचे असे ठरले होते. परंतु त्याचा निर्णय घेण्यासाठी ती जागा या समाजासाठी दफनभूमीसाठी मागावी असा विषय आणून महासभेचा ठराव करुन कलेक्टरकडे ते जाणे आवश्यक आहे.

**आसिफ शेख :-**

ठरल्याप्रमाणे दफनभूमी, स्मशानभूमी, बरेल ग्राउन्ड आणि जॉगिंग पार्क म्हणजे मिरा रोड प्रमाणे आपल्याला तिथे करायचे आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

विषय महासभेपुढे घ्या.

**आसिफ शेख :-**

तो महत्वाचा विषय आहे ते घटनात्मकरित्या सुविधा देणे बंधनकारक आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब ज्या सरकारी जागा आहेत जे सर्वे होणार होते

**मिलन म्हात्रे :-**

सर्वे नं २५३ याच्यामध्ये कुठेही नाही आहे याच्यामध्ये भरपूर आरक्षणे आहेत फार महत्वाची आहेत.

**दिनेश नलावडे :-**

ज्या सरकारी जागा होत्या त्याचे पैसे आपण भरले पण सर्वे काही होत नाही तर त्यासाठी किती दिवस लागले चार दिवस आठ दिवस पाच दिवस दोन महिने तीन महिने झाले त्याचे काय झाले?

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, शेंडे साहेबांना या विषयी बोलू द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो):-**

कृपा करुन ज्यावेळेला कर्मचारी इतर ऑफिसेसला जातो त्यांना बोलण्याच्या मर्यादा पडतात आणि आपण पदाधिकारी आहात. आपण पैसे भरले आणि पत्रही पाठविले आहे. आपण ही थोडेसे नगरपालिकेच्या कामासाठी आणि तुमच्या वॉर्डातील नागरी सुविधांसाठी आपण जर लोकप्रतिनिधी म्हणून जोर वाढविला तर लगेच येतील. आपण कुठेच महानगरपालिकेच्या कामासाठी जात नाही मंत्रालयात पण जायला पाहिजे कलेक्टर ऑफिसला पण आम्हांला मर्यादा असतात आम्ही करुन दया एवढी विनंती करणार आणि प्रत्येक वेळेला येणार तुम्हीसुध्दा जोर वाढवायला पाहिजे

**दिनेश नलावडे :-**

आपण सुचना केली ठिक आहे आम्हाला तसे पेपर दया सभापती महोदय आणि सन्मा. सदस्य आम्ही कलेक्टरकडे जाउ आम्ही तशी मागणी करुन घेउ

**एन. आर. शेंडे :-**

आदरणीय सभागृह आपला डेव्हलेपमेंट प्लॅन जो मंजूर झाला विकास योजनेची जी अंमलबजावणी करायची आहे ती आपली वैधानिक जबाबदारी आहे त्या दृष्टीने हा विषय आणलेला आहे याच्यामध्ये डेव्हलपमेंट प्लॅन मंजुर झाल्यानंतर, तयार झाल्यानंतर आतापर्यंत आपण काय काय डेव्हलपमेंट केले कोणती आरक्षणे ताब्यात घेतली या सगळयाचा अभ्यास आम्ही यामध्ये दिलेला आहे जी पहिली यादी आहे ती शासकीय जागा आपल्याला हस्तांतरित झाल्या आहेत त्याची यादी आहे त्याच्यानंतर जी दुसरी यादी आहे ती टी.डी. आर. च्या तरतुदीखाली आपण किती जागा ताब्यात घेतल्या ती यादी आहे तिसरी जी यादी आहे ती ॲकॉमडेशन रिझर्वेशन जी पॉलिसी आहे त्यातून कोणती रिझर्वेशन डेव्हलप झाले त्याची यादी आहे. त्याच्यानंतर जे गर्व्हर्नमेंट लॅन्ड आहे याच्यात मी अशी आकडेवारी सांगू इच्छितो की ३८६ रिझर्व्हेशनपैकी ३६२ रिझर्व्हेशन आपण डेव्हलप करायचे आहेत ३६२ रिझर्व्हेशन आपण डेव्हलप करायचे आहेत ३६२ रिझर्व्हेशनपैकी ३१५ रिझर्व्हेशन प्रायव्हेट जागेवर आहेत आणि ९२ च्या किंमतीप्रमाणे एक्विझिशन करायचे ठरवले तर त्याची कॉस्ट ६२ कोटी आहे. आणि जर आताची त्याची किंमत बघितली तर साडे नउशे कोटी ते आरक्षण एक्विझिशन करण्यासाठी लागेल त्याच्यामुळे आपल्याला इतर पर्यायाचा पण विचार करावा लागेल कारण की इतका पैसा आपण उपलब्ध करु शकू की नाही याचा आपण विचार करावा लागेल. तर त्याच्यापुढे इतर जे पर्याय आहेत टी.डी.आर.चे पर्याय आहे. अकॉमडेशन रिझर्व्हेशनचा पर्याय आहे तर या सगळयाची आतापर्यंत झालेली परिस्थिती आम्ही याच्यामध्ये दिलेली आहे त्याच्यानंतर ज्या २७ शासकीय जागा आहेत त्यापैकी सहा आपल्याला हस्तांतरित झालेल्या आहेत दहाची आपण मागणी केलेली आहे. ती आता फायनल स्टेजवर आहे. त्या जागा कदाचित मार्चपर्यंत आपल्याला उपलब्ध होतील तर त्यासुध्दा या प्रॅायॅरिटीवर आपण घेतलेल्या आहेत एक अशी ब्रॉड यादी आम्ही दिलेली आहे विकास योजना रस्त्याची जे रस्ते तातडीने विकासीत करणे आवश्यक आहेत ज्या मिसींगलिंग आहेत किंवा जे एरिया डेव्हलप होतात त्यामध्ये कोणते रंस्ते प्रॅायोरिटीचे विकसीत झाले पाहिजेत त्याच्यानंतर आम्ही आरक्षणाची लिस्ट दिली टोटल ३६२ जे रिझर्व्हेशन आहेत त्यापैकी ९२ आरक्षणाची यादी आम्ही दिलेली आहे. या ९२ आरक्षणातून जर ॲक्वीझिशन करायचे आजच्या हयाच्याप्रमाणे ठरले तरी साडे तीनशे कोटी रुपये लागतील ते सुध्दा आपल्याकडे उपलब्ध होउ शकणार नाही त्याच्यामुळे इतर पर्यायाचासुध्दा आपल्याला विचार करायला लागणार इतर पर्याय म्हणजे टि.डी.आर. खाली फक्त एफ.एस.आय. देउन जागा ताब्यात घ्यायची. त्याच्यात पैशाचा कुठला व्यवहार होत नाही त्याच्यांनतर ॲकॉमडेशन रिझव्हेशन तरतुद आहे त्याच्यामध्ये त्या रिझर्व्हेशनची तरतुद आहे ज्याच्यामध्ये त्या मालकाला डेव्हलप करण्याची परवानगी आपल्या अटीशर्ती प्रमाणे दयायची. म्हणजे गावात सुविधा तर उपलब्ध होईल पण आपला काही खर्च होणार नाही तर या सगळया तरतुदी विचारात घेउन ही टिपणी दिलेली आहे याच्यात आता उल्लेख झाला की याच्यात फक्त डॅश ठेवले आहे हे आमच्या जागेची काय परिस्थिती आहे याबददल यादी दिलेली आहे त्याचे डेव्हलपमेंट झाले असेल तर डेव्हलपमेंट झाले असे लिहीलेले आहे डेव्हलपमेंट व्हायचे असेल तर डॅश ठेवलेले आहे पूर्ण विकसित झाले असेल तर विकसित लिहिलेले आहे आणि हे ठरवत असताना आता हे धोरण आपण जर ठरवून दिले की ९२ ची यादी दिलेली आहे याच्यात आपण बदल करु शकता आमच्या दुष्टीने जी काही यादी बनवू शकत होती ती यादी आम्ही आपल्याला दिलेली आहे आपण त्या यादीमध्ये सुधारणा करु शकता आणि हे जे काही डी.पी. इम्लीमेंटेशनचे धोरण आहे. ते धोरण आपण ठरवून दिले तर त्या दिशेने आम्हाला यापुढे काम करता येउ शकेल. तर त्याच्यापुढे याबाबत सर्वांगिण चर्चा होउन एक धोरण ठरवून दयावे अशी माझी विनंती आहे

**रिटा शाह :-**

साहेब आपण यामध्ये सर्व यादी दिलेली आहे पण एक यादी याच्यात अशी दिलेली आहे की आपल्याकडे जी गर्व्हनमेंट रिझर्व्हेशन जागा आहे त्याच्यावर अतिक्रमण झालेले आहे ती यादी आपण यामध्ये दिली नाही.

**एन. आर. शेंडे :-**

आता हे अतिक्रमण आणि जे अनधिकृत बांधकाम आहे त्याच्यावर वेळोवेळी कारवाई केली जाते.

**रिटा शाह :-**

साहेब कारवाइ करण्याचे मी विचारत नाही आपली जी गर्व्हर्नमेंट लॅन्ड आहे कलेक्टर असू दे नगरपालिका असू दे कि सॉल्ट डिपार्टमेंटची असू दे ती ऑक्युपाय आहे की अनऑक्युपाय ती बिल्डिंग

झालेली आहे की नाही झालेली आहे अतिक्रमण झाले, अनधिकृत बांधकाम ती यादी आपण इथे सादर केली नाही.

**एन. आर. शेंडे :-**

त्याच्या सर्वेची यादी आता माझ्याकडे नाही.

**रिटा शाह :-**

साहेब बघा तुम्ही नगररचनाचे साहेब आहेत आणि तुम्ही असे बोलून चालणार नाही की ती यादी माझ्याकडे उपलब्ध नाही तुम्ही एवढी माहिती आम्हाला दिली तर ती माहिती तुमच्याकडे असायला पाहिजे.

**एन. आर. शेंडे :-**

३६२ रिझर्व्हेशन सर्वे झालेला आहे ते माझ्याकडे नाही.

**रिटा शाह :-**

साहेब ती आमच्या क्षेत्राची बाहेरची जागा नाही आहे आपल्याकडे डेव्हलपमेंट प्लॅन मंजुर झालेला आहे त्याच्यामध्ये पण तुम्ही बघु शकता.

**एन. आर. शेंडे :-**

डेव्हलपमेंट प्लॅनवर अतिक्रमण झालेली यादी त्यामध्ये नसते.

**रिटा शहा :-**

साहेब आपला हा जवाब योग्य नाही. आपण असा जवाब देऊन चालणार नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शहा यांनी जो प्रश्न मांडला तो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे की, जर आपण कुठलीही आरक्षणे विकसित करायची असतील तर ती पुर्वी जागा क्लिअर आहे की, नाही ते बघायला पाहिजे. नंतर टी.डी.आर. किंवा नंतर जागा विकत घ्यायची. तर याच्यामध्ये मला एकच बोलायचे आहे. जे प्राधान्य आपल्याला ठरवायचे आहे, जी आरक्षणे त्याच्यामध्ये समजा हॉस्पीटल्स आहेत, गार्डन्स आहेत, स्विमिंग पुल्स आहेत किंवा जे अन्य आहेत जे कन्स्ट्रक्शन वर्क होणार आहेत ती. ज्या आपल्या इमारती होणार आहेत त्या तर ऑक्युपाईड, अनऑक्युपाइड महत्वाचा विषय आहे. त्याच्यानंतर दुसरा विषय आपण दिला की, विकास योजनेतील रस्त्याची प्राधान्य यादी याच्यामध्ये मला काय बोलायचे आहे. एक हा असा विषय आहे, रस्त्यांचा असा विषय आहे. तर त्या रस्त्यामध्ये आम्हांला एकही पैसा लागत नाही आणि आजपर्यन्त लागला नाही. त्याला आपण टी.डी.आर. देतो. ४० टक्के आहे, ३० टक्के आहे की नाही माहिती नाही. ४० टक्के होता. तो आपण देत आहोत. मला काय म्हणायचे आहे. विकास योजनेत आपण ही आरक्षणे दिली आणि सर्व सन्मा. सदस्यांचे असे म्हणणे आहे की, हा गोषवारा आम्हांला वेळेवर मिळाला नाही. तो रात्री दिला. तर कोणती गोष्ट या शहराच्या विकासाच्या बाबतीत आहे. एवढे वर्ष आपण थांबलो किंवा मा. सभापती म्हणाले की, तीन महिने या विषयाला गेले. तीन महिने गेले हे रास्त आहे. आपली शहराबद्दल, विकासाबद्दल आपली कळकळ, आम्ही पण या तळमळीशी सहमत आहोत. याच्यात कोणाचे दुमत नाही आहे. कामे झाली पाहिजेत आणि जर आपण प्राधान्य ठरविल्यानंतर हा विषय महासभेपुढे जाणार आहे. महासभेपुढे जाऊन तो पुन्हा तिथे होणार आहे. किती तारीख आहे महासभेला? एक महिना आहे. कालच महासभा पार पडली. म्हणजे अजून एक महिना आहे. म्हणजे इथे हे धोरण नाही. इथे आपण फक्त निश्चित करणार आहोत. तर आपल्याला याच्यामध्ये एक-दोन आठवड्याचा वेळ मिळाला. दोन आठवड्याची गरज पण आपल्याला नाही. तर आपल्याला हे निश्चित धोरण तिकडे क्लिअर होणार आहे. सभापती महोदय बोलतात ते बरोबर आहे. जर हा विषय तुम्ही मागच्या वेळेला आणला असता ही महासभा लागण्यापुर्वी तर हा विषय ताबडतोब तिथे गेला असता आणि तो कार्यान्वीत झाला असता. तर हा विषय धोरण ठरविण्याची, चर्चा करण्याची संधी आपल्याला मिळालेली आहे आणि सोळा मेंबरकडे आज सभापती महोदय समवेत ही संधी दिलेली आहे. त्यांनी शहराचा विकास कोणत्या पद्धतीने केला पाहिजे आणि कोणाला प्राधान्य दिले पाहिजे. ही काम करण्याची संधी आम्हांला प्राप्त झाली आहे. तर त्या संधीचा फायदा आम्ही जरुर उचलू आणि जरुर आम्ही या ठिकाणी लवकर निर्णय घेऊ. परंतु जसे मी या गोषवाऱ्यामध्ये एक विषय या ठिकाणी क्लिअर आहे की, त्या रस्त्यांना कुठे काही लागणार नाही आहे. सभापती महोदय, याला तुम्हांला टी.डी.आर. वगैरे कुठे काही लागणार नाही. तिथे आपण रस्ता आखतो त्यांना बिल्डींगचे प्लॅन पास करतो. मग तुम्ही या सभेत या

रस्त्यांची शिफारस करुन टाका आणि दुसऱ्या सभेला हा विषय पुन्हा चालू ठेवा आणि पुन्हा दुसऱ्या सभेला हा विषय घ्या आणि प्राधान्य कसे ठरवायचे? मग जागा जर सन्मा. सदस्या रिटा शहा ह्यांनी सांगितले की, ऑक्युपाईड आहे की नाही आहे. सरकारी झोपडपट्टी किती आहे? काय आहे? स्लॉटर हाऊस आहे, कॅम्प आपल्याला बांधायच्या आहेत. तर अशा पद्धतीने आपण केले तर सन्मा. सदस्य तुम्ही सुपारी घेतली असे काय म्हणता? तुम्ही चुकीचे बोलता. सभापती महोदय, आम्ही सन्मा. सदस्यांचा मान ठेवतो. त्यांना सन्मानित करतो. प्रश्न येतच नाही. ते माझे मित्र आहेत याच्यात दुमत नाही आहे. परंतु, जर आपण सभागृहामध्ये जबाबदार सदस्य या नात्याने बसतो. मग त्यावेळेला एक विशेष शब्द वापरल्यानंतर नाही येणाऱ्या त्या याला वेगळा संशय येतो, वेगळे वळण लागते. हे सभागृहाला कृपया बोलू नये. माझी तुम्हांला कळकळीची विनंती आहे. तर मला असे बोलायचे आहे की, आपण केले ते क्लिअर कट आहे. याला टी.डी.आर. द्यावा लागतच नाही. कारण आपण जेव्हा प्लॅन पास केल्यानंतर आपण देतो. म्हणून रस्त्याच्या विकासाचा प्रश्न हा यामध्ये क्लिअर कट आहे. याची आपण शिफारस केली आणि पुढच्या सभेत हाच विषय गेल्यानंतर हे लागूच आहे. हा विषय होतच नाही म्हणून कृपया आपण हा विषय मागे घेतला तर बरे होईल असे माझे मत आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

रस्त्याचा जो विषय आहे. आता तुम्ही शिफारस केली. तो रस्त्याचा विषय मुळ आपल्याला महासभेमध्ये ठराव करुन जर मंजुर केला तर ते लोक आपल्याकडे येतील. म्हणजे एकदा हे हे रस्ते किंवा हे हे आरक्षण हे भुसंपादन करायचे आणि ऑब्लिंग टी.डी.आर. देऊन असा जर फक्त ठराव झाला तर त्या विषयाला चालना मिळेल. म्हणजे ते लोक धावत येतील. भुसंपादन करुन नका. आम्हांला टी.डी.आर. द्या आणि जागा घ्या आणि आपण हे विषय घ्यायचे जरुरी नाही म्हटले तर ते लोक हे काय घेणार नाहीत. आपल्याला काय जायची जरुरी नाही असे होणार. म्हणजे आपल्याला आता फक्त महत्वाचा यासाठी विषय आहे की, या पंधरा-वीस दिवसामध्ये बजेट येणार. बजेटमध्ये निदान अत्यावश्यक सेवा कोणकोणत्या धरायच्या याचे तरी पाच-सहा निर्णय घ्यावा. उदाहरणार्थ, मार्केट. या गावामध्ये रस्त्यावरच मार्केट बसतो. दुसरे स्मशानभुमी एग्झिस्टींग आहे. त्याची फक्त वाढीव जागा आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुम्ही जे बोलता ते बरोबरच आहे. आपल्याला हे महासभेपुढे जाणारच आहे. बजेट अत्यंत महत्वाचा आहे. पुढच्या ह्याच्यात आपण क्लिअर करुन घेऊ आणि शेंडेजी रिपोर्ट आपण घेऊ या. जे असेल ते.

**रिटा शहा :-**

साहेब, पुढच्या सभेला घेण्यापुर्वी त्या सर्व रिझर्व्हेशनचे हे आम्हांला द्या.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आता हा जो विषय आलेला आहे. आता आपण पुढे विषय घेणारच आहोत. त्यापुर्वी आपल्या दालनामध्ये सन्मा. सदस्यांना थोडेसे बोलावून चर्चा करुन प्रायॉरिटीवर कुठले विषय आपल्यला पुढच्या वेळी घ्यायचे. त्याचे आपण निश्चित धोरण करावे. जसे काही सर्वांच्या दृष्टीकोनातून महत्वाचा विषय आहे. भाईंदर चौपाटी, शिवार गार्डन, वेस्टचे मैदान असे जे आहेत ते आपल्या अंदाजपत्रकानुसार ठराविकच विषय आपल्याला मंजुर करावे लागतील आणि त्याचा आपल्याला येत्या बजेटमध्ये या विषयावर प्रयोजन करावे लागेल. सगळे विषय तर आपण पास करु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

ते महासभेला जाणार. आपण निर्णय घेतला तर ही फक्त शिफारस आहे. पण ते महासभेला जाईल. तुम्ही ते निश्चित म्हणता हे धोरण आहे. धोरण महासभेपुढे जाईल. तुम्ही आधी ते निश्चित केले महासभेपुढे जाईल. महासभेपुढे गेल्यानंतर तुम्ही कार्यान्वीत करणार आहात. बजेटचे काम सुरु होणार आहे. प्रश्न येत नाही आणि बजेटही महासभेपुढे जाणार नाही. म्हणून तुम्हांला फरक पडणार नाही. दुसरे तुम्ही बोलाल हा रस्त्याचा विषय क्लिअर करा. टी.डी.आर. घेतला तो दिला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, याला थोडा टाईम लागेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठराव झाला आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, पण ते सभसभेपुढे गेल्यानंतरच कार्यान्वीत होणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आम्हांला स्टडी करु द्या. आता इकडे तुम्ही चौपाटीचे आणले, रेतीबंदरला पण दिले त्यांनी.

**आसिफ शेख :-**

साहेब, दोन-तीन दिवसांत विशेष सभा लावा.

**मा. सभापती :-**

पण आपल्याला बसायला वेळ नाही.

**आसिफ शेख :-**

साहेब, तुम्ही बोलतच नाही.

**मा. सभापती :-**

आपण दोन-तीन प्रायॉरिटी ठरविल्या असत्या तर.

**मिलन म्हात्रे :-**

आरक्षण क्र. २६४ याच्यामध्ये नाट्यगृहाचा उल्लेख केलेला नाही आहे. याच्यानंतर जी हॉस्पीटल्स आहेत. हॉस्पीटल्स आपल्याला अन्य ठिकाणीसुद्धा घ्यायची आहेत. त्याचासुद्धा उल्लेख केलेला नाही आहे.

**रिटा शहा :-**

साहेब, हॉस्पीटलच्या रिझर्व्हेशनमध्ये बिल्डींगचे बांधकाम चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे नसतील त्याचे घ्यावे.

**रिटा शहा :-**

विषय कुठला आहे मला माहिती आहे. त्याबद्दल मी बोलत नाही. पण अशी रिझर्व्हेशन जिथे बांधकाम चालू आहे त्याची माहिती आम्हांला द्या.

**मा. सभापती :-**

शेंडे साहेबांनी पुढच्या वेळी ही सर्व माहिती द्यावी.

**रिटा शहा :-**

साहेब, तसे नाही आहे. आम्ही खरोखर तुम्हांला ले आऊट दिलेले आहे.

**प्रकरण क्र. २१४ :-**

आरक्षणातील जागा विकसित करणेकामी अग्रक्रम ठरविणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १९५ :-**

सदरचा विषय मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यांत आला.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१५ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी सालाबादप्रमाणे याही वर्षी चषकाचा विषय आपल्याकडे आलेला आहे आणि शहरामध्ये महापौर चषक होणे फार जरुरी आहे. क्रिडा, कला क्षेत्रामध्ये सर्व क्रिडापटूंना किंवा कलाप्रेमींना आपण संधी दिली पाहिजे अशा पद्धतीने आपण करत आहोत आणि या ठिकाणी जो गोषवारा आपल्याकडे दिलेला आहे. तेरा लाख चाळीस हजार रुपये सध्या आपल्याकडे रक्कम आहे. तर हा महोत्सव लवकरात लवकर कसा करता येईल या उद्देशाने येत्या दोन दिवसामध्ये आपला हा विषय झाला पाहिजे, दोन दिवसाचा. कारण मागच्या वेळी बराच ताण याच्यामध्ये पडला होता. हा ताण पडता कामा नये. आपल्याकडे बजेटची कामे पडलेली आहेत आणि लवकरच आचारसंहिता लागू होणार आहे. कारण जर लोकसभेची आचारसंहिता सुरु झाल्यानंतर ताबडतोब पाठोपाठ विधानसभेचे इलेक्शन लागण्याची शक्ता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण या ठिकाणी कमी वेळेमध्ये महापौर चषक कसा पूर्ण करता येईल. जसे आम्ही मागच्या वेळेला तीन-चार दिवसघेतला

होता. त्याच्यामुळे बराचसा ताण या ठिकाणी पडला होता. तर असा ताण पडता कामा नये. म्हणून या ठिकाणी बक्षिसाकरिता एक लाख पन्नास हजार रुपये, प्रवास भत्ता पाच लाख रुपये, कॅटरिंग सर्व्हिससाठी अडीच लाख रुपये, टी-शर्टसाठी एक लाख रुपये, मंडप-स्टेज आदींसाठी दोन लाख चाळीस हजार रुपये, स्पोर्टस् सामान पन्नास हजार रुपये, बॅनर, झेंडे पन्नास हजार रुपये असे मिळून तेरा लाख चाळीस हजार रुपये अमाऊंन्ट आपण फिक्स केली. आपल्या बजेटमध्ये ही अमाऊंन्ट आहे आणि मागच्या वेळेला काही गोष्टी आणण्यामध्ये आणि काही गोष्टी करण्यामध्ये फार उशीर झाला होता आणि त्याच्यामध्ये ब-याचशा अडचणी निर्माण झाल्या तर आता आपल्याकडे वेळ आहे. या वेळेच्या अवधीमध्ये आपण जी बक्षिसे आणि अमाऊंन्ट दिली आहे. या अमाउंट करिता आपल्याला टेंन्डर मागवायचे असतील ते टेंन्डर आपण त्या वेळेमध्ये मागवू शकतो. तरी कृपया आपण याची वेळ निश्चित करावी आणि कोणते स्पोर्टस् या ठिकाणी घेतले पाहिजेत याचा उल्लेख आणि याची चर्चा या ठिकाणी व्हावी अशी सन्मा सदस्यांना मी विनंती करीत आहे.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, ज्याप्रमाणे गेल्या वर्षी महापौर चषक झाला. त्याचप्रमाणे त्याच पद्धतीने कारण गेल्या वर्षी आपण टेंडर काढली नव्हती. तर माझे असे म्हणणे आहे की, या वर्षी पण टेंडर काढू नये. थोडा सर्वांवर विश्वास ठेवावा. तुमच्यावर आणि जे महापौर चषकाच्या कमिटीचे मेंबर आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवावा.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला मी त्या कमिटीवर होतो. ज्या वेळेला टेंडर काढायची, जरा एक मिनीट, कुठलेही काम टेन्डरविना देऊ नये असे माझे स्पष्ट मत आहे. टेन्डर काढावी याकरिता कारण गेल्या वर्षी त्या कमिटीवर मी होतो. आम्ही आपल्या दोन-तीन सभेला हजर राहिलो. त्यानंतर काय झाले आम्हांला कोणीच काही सांगितले नाही. पण या ठरावामध्ये असेही नमुद करुन घ्या की, सर्व देयक बिले ही योग्य वेळी द्यावीत. कारण गेल्या वेळेची बिले अजूनपर्यन्त दिली गेली नाही. ते मागे फिरतात. ह्याच्यात एक टिप टाकून घ्या. माझी ही उपसुचना आहे.

**मा. सभापती :-**

माझ्या काळात असे कधी होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या काळात नाही पण जे झाले ते बोलतो. साहेब, महापालिका तीच आहे. स्थायी समिती पण तीच आहे.

**मा. सभापती :-**

मी त्या अधिका-यावर ताबडतोब कारवाई करेन. त्याला हाकलून दिला जाईल. माझ्याकडे जर आला तर की, पैसे बाकी आहेत. त्या अधिका-याला इकडून हाकलून देईन.

**मिलन म्हात्रे :-**

मी म्हणून सांगतो. तो टेंन्डर घेणारा आहे. त्याला नंतर तो त्रास झाला आणि त्याने टेंन्डर रितसर घेतले नव्हते. जो आला त्याला लोकांनी देऊन टाकली आणि मग सगळी बिले बनवून टाकली. परिणामी त्यांचे नुकसान झाले.

**दिनेश नलावडे :-**

आता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलतात की, गेल्या वर्षीची बिले अजून दिलेली नाहीत. हा प्रकार बरोबर नाही. माजी सभापती साहेब थोडासा या संदर्भात खुलासा करतील.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला खुलासा कशाला पाहिजे?

**दिनेश नलावडे :-**

हे आता एवढा मोठा आरोप करतात की, गेल्या वेळेची बिले अजून आपण दिलेली नाहीत.

**मोहन पाटील :-**

आता तशी कोणाची बिले अजून बाकी नाही आहेत. बिले दिलेली आहेत. बिले लेट झाली.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, या ठिकाणी प्रकरण क्र. २१५ महापौर चषक आयोजित करण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासंदर्भात विषय विषयपटलावर आजच्या सभेत आहे. तर त्यामध्ये मागच्या वेळी ज्या पद्धतीने मोठ्या प्रमाणात महापौर चषक स्पर्धा आपण आयोजित केल्या आणि त्यामध्ये स्थायी समितीच्या सदस्यांपैकी सात-आठ लोकांची आपण एक कमिटी गठित करु या आणि त्या समितीचे अध्यक्ष हे आपले सन्मा. सभापती हे असतील आणि बी.जे.पी.कडून एक, शिवसेनेकडून एक, जनता दलाकडून एक आणि प्रशासनाचे एक उपआयुक्त अशी नऊ लोकांची कमिटी गठित करण्यांत यावी. प्रत्येकाचा एक-एक प्रतिनिधी घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्या आसिफ शेख साहेब असे आहे की, गेल्या वेळेला आपण ही एक समिती गठित केली. त्यावेळेला मा. सभापतींना माहिती आहे की, वास्तविक त्यावेळेला आम्हीसुद्धा वेळ देऊ शकलो नव्हतो आणि सभापतींना जास्त अतिरिक्त ताण पडला. त्यामुळे त्यांनी जे सोळा सदस्य स्थायी समितीचे आहेत. ते सर्व तिथे असावेत कारण मग सगळे जण वेळ देऊ शकत नाही. मग गडबड होते.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, यामध्ये खेळ कुठचे घ्यायचे ते पहिले करा. कारण गेल्या वेळेला शुटिंग बॉलला एवढा खर्च आपल्याला झाला होता. तो अवाच्या सव्वा सर्व खर्च आहे आणि मला वाटत नाही शुटिंग बॉलचे राष्ट्रीय स्तरावर घेवू नये.

**दिनेश नलावडे :-**

शुटिंग बॉलला आपल्या भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत. ते अग्रेसर आहेत.

**शरद पाटील :-**

भाईंदर महानगरपालिकेचे जे आपले खेळाडू आहेत. तरी ते भाईंदरमधलेच घ्या. राज्य स्तरावर आणण्याची गरज नाही. त्याला फार खर्च होतो आणि फार त्रास होतो.

**दिनेश नलावडे :-**

मग आपण धोरण निश्चित केले पाहिजे. नको असे कसे चालेल?

**शरद पाटील :-**

मी नको असे बोललो नाही. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे आपण कधी ऐकले नाही. सन्मा. सदस्यांनी बोलले आहे की, तुम्ही राज्य स्तरावरुन नेऊ नका. इकडचे इकडे घ्या.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य शरद पाटीलजी आपल्याकडे तेरा लाख चाळीस हजारची तरतुद आहे. त्या तेरा लाख चाळीस हजारमध्ये ताण पडणार नाही एवढेच संघ आपण बाहेरुन ठेवु शकतो.

**शरद पाटील :-**

गेल्या वेळेला संघ आले. आम्ही बघितले. ते संघ जसे यायला पाहिजे तसे आले नाहीत.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य नितीन ठाकूर या ठिकाणी कला क्रिडा भरवतात. त्यांना चांगला अनुभव आहे. कला क्रिडा इंन्टर भाईंदर भरवतात. तर इंन्टर भाईंदरच भरवू द्या असे आमचे स्पष्ट म्हणणे आहे.

**आसिफ शेख :-**

राज्य स्तरिय भरवू या.

**शरद पाटील :-**

राज्य स्तरिय काय? अव्वाच्या सव्वा पैसे असतात आणि ते पैसे फार त्रासदायक असतात.

**दिनेश नलावडे :-**

आपल्याकडे तरतुद आहे.

**मा. सभापती :-**

आता ठराव मंजुर झाला आहे.

**मोहन पाटील :-**

ठराव मंजुर झाला तरी तुम्हांला खेळ ठरवायला लागतील.

**मा. सभापती :-**

खेळ आपल्याला दोन दिवसांत उरकायचा आहे. शनिवार आणि रविवार घ्यायचा आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, तुम्ही एक सभा बोलवा. त्यात आपण ठरवू कोणकोणते खेळ घ्यायचे व तसे त्याचे आपण आयोजन करु.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आज आपण जे खेळ निश्चित करणार आहोत. मी एक तुम्हांला सांगतो, सुभाषचंद्र बोस मैदानावर महापौर चषकाचे खेळ होतात. सभापती साहेब, मी आपल्याला विनंती करतो, शुटिंग बॉलसारखे जे खेळ आहेत. ते नवघर मैदानावर व्हावेत. जेणेकरुन तिकडच्या नागरिकांना त्याचा लाभ मिळेल. नवघर मैदान पण चांगले आहे. सभापती महोदय, आमची विनंती मान्य करा. नवघर मैदानावर पण शुटिंग बॉलसारखे खेळ व्हावेत.

**प्रकरण क्र. २१५ :-**

महापौर चषक आयोजित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १९६ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailakonao jaanaovaarI 2003 maQyao mahapaOr caYakaMtga-t spQao-cao Aayaaojana kolaolao haoto. sadr spQao-sa maaozyaa p`maaNaavar p`itsaad laaBaUna spQaa- yaSaisvair%yaa par pDlyaa hao%yaa. sana 2004 maQyao mahapaOr caYak Aayaaoijat krNaobaabat maa.nagarsaovak pdaiQakarI yaaMcyaakDUna maagaNaI krNyaat AalaolaI Aaho. sadr mahapaOr caYak Aayaaoijat kravayaacyaa Asalyaasa KalaIla p`maaNao Kca- Apoixat Aaho.

| A.Ë. | tpiSala | r@kma |
|---|---|---|
| 1´ | baxaIsao | $.1¸50¸000À¹ |
| 2´ | p`vaasa Ba<aa va maanaQana | $.5¸00¸000À¹ |
| 3´ | k^TrIMga saivh-saosa | $.2¸50¸000À¹ |
| 4´ | TISaT-¸ TaopI¸ p^nT | $.1¸00¸000À¹ |
| 5´ | maMDp¸ sToja¸ laa[-T\sa¸ Tobala Kucyaa- va [tr vyavasqaa | $.2¸40¸000À¹ |
| 6´ | spaoT- saamaana | $.50¸000À¹ |
| 7´ | ba^nasa-¸ JaoMDo | $.50¸000À¹ |
| | **ekuNa** | **$.13¸40¸000À¹** |

varIla p`maaNao Kca- Apoixat AsaUna mahapaOr caYak Aayaaoijat kravayaacaa Asalyaasa sava- kamao k$na GaoNyaakrIta inaivada saucanaa p`isaQd k$na inaivada maagavaUna kayaa-doSa dyaavao laagaNaar Aahot.

trI sana 2004 maQyao mahapaOr caYak Aayaaoijat k$na yaoNaa¹yaa Kcaa-baabat Aqa-saMklpat trtUd k$na Kca-krNyaasa maanyata doNyaat yaot Aaho. स्थायी सर्व सदसर व उपायुक्त (मु.) यांची कमिटी करण्यांत यावी.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**याकुब कुरेशी :-**

सचिव साहेब, यांत आपण फक्त सोळा सदस्यांचा उल्लेख केलेला आहे. उपायुक्तांचा उल्लेख करा.

**प्र. सचिव :-**

सोळा सदस्य व उपायुक्त अशी कमिटी राहील.

**मोहन पाटील :-**

महापौर चषक मंजुर झालेला आहे. हा नवघर मैदानावर घ्या. एक विषय असा आहे की, प्रोसिडींगमध्ये आपला नंतर विषय येत नाही. स्टँड पोस्ट बंद करायला घेतलेले आहेत आणि भाईंदर पुर्वेला पाणी अतिशय कमी प्रमाणात आहे. नवघर टाकी चालू झाल्यानंतर पुर्वेला बी. पी. रोडला पाणीच येत नाही. त्यांचे म्हणणे पश्चिमेला पाणी येत नाही. कृपया तो आढावा घेऊन प्रोसिडींगमध्ये आणा.

**आसिफ शेख :-**

गरिबांचे स्टँन्डपोस्ट बंद करु नका. आता पाईप लाईन पूर्ण करुन घ्या.

**शरद पाटील :-**

सभा संपली असली तरी याच्यावर चर्चा होऊ द्या.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**